संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 3 | Marathi Monthly | Thane, 1 September 2025 to 30 September 2025 | Pages 16 | Price : 10/-

# नेहरुंचा पुतळा आणि शुभ्र दाढीवाले गृहस्थ : चुकांची उजळणी

तुम्ही चुका काढत रहा... एखाद्याचं नाव वारंवार घेतल्यावर, त्याचं मनापासून नामस्मरण केल्यावर, तो प्रसन्न होऊन प्रकट होतो, ही देवादिकांपासूनची भारतीय परंपरा आहे. गेली दहा-पंधरा वर्षे, आपल्या नावाचा सतत जप सुरु आहे, आपल्या नावाचा घोष सुरु आहे, जवळपास रोज आपल्या नावाचा उच्चार होतो हे पाहून, अखेर जवाहरलाल नेहरुंच्या दिल्लीतल्या पुतळ्यांना जाग आली. त्यातले काही अर्धपुतळे होते, त्यांना चालणे शक्य नव्हते. काही पुतळे कबुतरे उडवणारे होते, त्यांना कबुतरांकडे लक्ष द्यायचे होते. जेएनयूमधील पुतळा एक पाऊल पुढे टाकतानाच्या पवित्र्यात होता, त्यामुळे तोच चौथऱ्यावरुन उतरला आणि चालू लागला. नेहरु जवळपास ६० वर्षांनी चालत होते, त्यामुळे त्यांना तोल सावरायला काही क्षण लागले. मग ते आपले नाव ज्या दिशेने सर्वाधिक वेळा घेतले गेले, त्या दिशेनं आवाजांच्या लहरींचा शोध घेत चालू लागले आणि एका गृहस्थासमोर जाऊन थांबले. आपली शुभ्र दाढी खाजवित कसल्या तरी गहन विचारांत गढलेल्या, पंच्याहत्तरीला आलेल्या त्या व्यक्तीसमोर जाऊन १३६ वर्षे वयाचे नेहरु उभे राहिले आणि विचारलं, **''तुम्ही माझी आठवण काढता का वारंवार?''** गृहस्थाने नेहरुंकडे पाहिले, स्मित केले आणि म्हणाले, ''हो, आठवण काढतो, परंतु तुम्ही प्रत्यक्ष येऊन काही बोलावं असं मात्र मला कधीच वाटलं नाही. मला तो एक खेळ फार आवडतो, आपण चेंडू फेकायचा, तो भींतीवर आदळून पुन्हा आपल्याकडेच येतो, मग पुन्हा मारायचा. त्या बाजूला दुसरा खेळाडू असेल तर मजा येत नाही खेळायला.''

नेहरु म्हणाले, ''तुम्हाला काय आवडतं, ते तुम्ही खेळत रहा, माझी वारंवार आठवण कशाला काढता, तेवढं फक्त सांगा, म्हणजे मी जातो आणि पुन्हा चौथऱ्यावर उभा राहतो.''



गृहस्थ थोडा विचारात पडला आणि म्हणाला, ''तुम्ही माझ्याविरोधात काही सांगितलंय का डोलान्डला? कारण तो....'' नेहरुंनी 'त्या' गृहस्थाला मध्येच थांबवलं आणि म्हणाले, ''मी काही त्यांना ओळखत नाही, परंतु ते डोनॉल्ड असेल बहुतेक डोलान्ड असं नाव कधी ऐकलं नाही मी...'' शुभ्र दाढीवाले गृहस्थ थोडे वैतागले...

''मी तुमच्या एवढ्या चुका काढतो, म्हणून तुम्ही माझी चूक काढता आहात का?''

''तुम्ही माझ्या चुका काढता?''

''हो, किती चुका करुन ठेवल्या आहेत तुम्ही? संपतच नाहीत, रोज नवी चूक सापडते तुमची मला!''

**''अच्छा... तुम्ही गांधीजींना ओळखता का?''**

**''हो, तेच ना, ज्यांनी 'स्वच्छ-भारत'चा नारा दिला होता?''**

**''गांधीजींना तुम्ही स्वच्छ भारताच्या घोषणेसाठी ओळखता? हे म्हणजे, प्रभू श्रीरामचंद्रांची ओळख, 'ज्यांनी शबरीची उष्टी बोरे खाल्ली होती, अशी करुन दिल्यासारखे आहे!''**

**''तुम्ही कृपया मला काही शिकवू नका. मला शिकण्यात कधीच रस नव्हता, माझा जन्म फक्त शिकवण्यासाठी झालेला आहे.''**

''नशिबवान आहात. आमचा जन्म शिकण्यात गेला आणि तरीही आपण फार काही शिकू शकलो नाही, अशी खंत होती मला...''

शुभ्र दाढीवर हात फिरवीत, त्या गृहस्थाने आपल्या नशिबाचे कौतुक ऐकून घेतले. त्याचा चेहरा हसरा झाला. त्यावर नेहरु म्हणाले, ''बरं ते असू द्या, मी तुम्हाला गांधीजींविषयी सांगत होतो. गांधीजी म्हणाले होते, 'एकच चूक पुन्हा करु नका, नवी चूक करा.'

...पृष्ठ क्र. १३ वर

## राहुल गांधी : सडक ते संसद, एक स्वप्नवत प्रवास

राहुल गांधी एकाचवेळी किती लढाया लढला असेल, याची फक्त कल्पना करा... एका पराभूत पक्षाचं नेतृत्व, 'घराणेशाही' या शब्दाचं ओझं, पक्षांतर्गत बेबंदशाही, जनमानसांत प्रतिमेला पडलेले तडे, हाताशी संघटन आहे; पण, त्यात उर्जा नाही, समोर महाकाय शत्रू, तोही कटकारस्थानी... अशा महाकाय शत्रूला, जनतेचं महाकाय पाठबळ. अखिल भारतीय मिडीया शेवटपर्यंत विरोधात, गांधी नाव जाऊन, हाती केवळ 'पप्पू' नाव उरलेलं. विरोधाचं एवढं तुफान उठलेलं असतांना, तो एकटा निघाला देशांतर्गत पदयात्रेला. यश येईल की, अपयश हेही माहीत नव्हतं त्याला. त्याला थोपवायचं होतं तुफान जातीयतेचं तसंच, धर्मांधतेचं... हाती ना शस्त्र ना ढाल... होतं ते केवळ बाबासाहेबांचं संविधान आणि 'मोहब्बत'चं गाठोडं!

...पृष्ठ क्र. २ वर

## न्यायदान-प्रक्रियेला 'चूड' लावणारे, धनंजय चंद्रचूड

१) सगळे न्यायालयीन-संकेत धाब्यावर बसवत बेशरमपणे पं. नरेंद्र मोदींना घरच्या गणपतीला आरतीसाठी बोलावणारे....

२) तथाकथित व स्वयंघोषित 'सद्गुरु' जग्गी वासुदेव यांच्या ईशा-फाऊंडेशनच्या आश्रमावर केल्या गेलेल्या लैंगिक-गुन्हेगारी आरोपांबाबत व गैरकारभाराविषयी मद्रास उच्च-न्यायालयाने लावलेली चौकशी टाळण्यासाठी घाईघाईने २४ तासाच्या आत 'SUO MOTO' स्वतःच्या हाती ते प्रकरण घेऊन चौकशी रोखण्याचा आदेश देणारे....

३) केंद्र सरकारच्या काश्मीरचं कलम ३७० रद्द करण्याच्या वादग्रस्त निर्णयाला समर्थन देणारे....

४) इलेक्टोरल-बॉण्ड योजना, एक घोटाळा म्हणून जरुर रद्द केली; पण, त्यासंदर्भात कुठलीही SIT चौकशी लावली नाही अथवा घोटाळ्यातील हजारो कोटींची रक्कम बीजेपीकडून वसूल करण्याचा आदेश न देणारे....

...पृष्ठ क्र. २ वर

अंतरंग




मुंबईतील मग्रूर गुजराथी-जैन समाज

पृष्ठ क्र. ३



हिंदू देवतांवर आणि अंधभक्तांवर, सावरकरांनी ओढले शाब्दिक आसूड!''

पृष्ठ क्र. ७



कार्ल मार्क्स ते टेक्नो-फ्यूडलिझम : कामगार-मुक्तीचा प्रवास

पृष्ठ क्र. ८

देवेंद्रजी, आमदार नावाची (काही) बोकडं, कुणाच्या जीवावर एवढी माजलीयेत?

....दत्तकुमार खंडागळे

पृष्ठ क्र. ९

*शेठवरी डोलांड धुरंधर असे कसे रुसले*
*मला हे विश्वगुरु दिसले*
*पुतिन उभा हा तेल घेऊनी, तरी ट्रम्प का*
*जाई जळुनी*
*भारतीय सरकार जनांच्या मरणावर टपले*
*मला हे विश्वगुरु दिसले*
*मिठी भयंकर बसता तुमची, वाट लागली या देशाची*
*विमानांतुनी निर्दय पाखरु स्वानंदे फिरले*
*मला हे विश्वगुरु दिसले*
*तुम्हीच केली सारी किमया, प्रचार ट्रम्पचा*
*गेला वाया*
*तुमच्यापायी देशावरती टॅरिफ हे बसले*
*मला हे विश्वगुरु दिसले*

**काव्यप्रेरणा - सुस्मृत जगदीश खेबूडकर**
**गजू तायडे**

## 'चूड' लावणारे, धनंजय चंद्रचूड ...पृष्ठ क्र. १ वरुन

५) वर्ष-२०२२मध्ये शिवसेनेतून फूटून निघालेल्या आमदारांच्या 'अपात्रते'संदर्भातला निर्णय केंद्र-सरकारच्या इशाऱ्याने जाणिवपूर्वक प्रदीर्घकाळ प्रलंबित ठेवल्याचा गंभीर आरोप असणारे....

"Quid Pro Quo" म्हणून मोदी-सरकारकडून मेहरबानीखातर निवृत्तीपश्चात हवा तसा सरकारी-बंगला मिळवणारे... न्यायालयीन-प्रतिष्ठेला आणि न्यायदान-प्रक्रियेला शब्दशः 'चूड' लावणारे, माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, इथेच थांबत नाहीत.

...त्यांच्या नव्याकोऱ्या करोडो किंमतीच्या खाजगी मर्सिडीज बेंझ कारला 'खास नंबर' मिळावा म्हणून बेकायदेशीररित्या सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारला स्थानिक RTO कार्यालयाला गुप्तपणे पत्र पाठवायला लावतात.

## राहुल गांधी : सडक ते संसद, एक स्वप्नवत प्रवास ...पृष्ठ क्र. १ वरुन

या दोन गोष्टींचं भांडवल घेऊन, तो निघाला देश जिंकायला. हा देश जिथे जिथे फाटला तिथे तिथे तो शिवत गेला. हा देश नेहरुंनी विणला होता, तो फाटलेला देश आता, पणतू नव्याने शिवणार होता. शेवटी त्याच्या या प्रामाणिक प्रयत्नाला आणि दृढनिश्चयाला जनतेने साथ दिलीच. मान्य आहे ती कमी होती; पण, देशाच्या मुळावर उठलेल्या हरामखोरांच्या पतनाला पुरेशी होती. सत्तेत यायला दोनशे बहात्तर जागांची गरज असतांना, त्यांना चारशे जागा पाहीजे होत्या... हेच राहुलने हेरलं आणि तो लागला कामाला. दोनशे चाळीसवर अडकवलं त्यांना आणि संविधान वाचवलं देशाचं. आज देशाच्या विरोधी पक्षनेत्याचा मानही मिळवला आणि देशाच्या मनात एका सुसंस्कृत आणि समंजस नेत्याची आशाही जागृत केली. देशाचं नेतृत्व कसं नसावं; या काळात, ते कसं असावं हे स्वतः पटवून दिलं. सडक ते संसद, खरंच एक स्वप्नवत प्रवास वाटतो राहुल गांधींचा. राहुल गांधींनी जे केलं, ते खूप चांगलं केलं; पण, त्याहीपेक्षा त्यांना अजून चांगलं करायचं बाकी आहे... टाकीचे घाव जो सोसतो, तोच एक अद्वितीय शिल्पकला कोरु शकतो... चला, आपण अशा सच्च्या भल्या माणसाला पाठबळ देऊया !!! **...न्यूटनचा मावसभाऊ**

# पाहा, काळ्या पाण्याची शिक्षा झालेले किती लोक आहेत.

**मित्रांनो, आपण यांना ओळखता का...?**

१. स्वातंत्र्यवीर अण्णाजी,
२. स्वातंत्र्यवीर भीमाजी
३. स्वातंत्र्यवीर बागल यदु पाटील
४. स्वातंत्र्यवीर भीमराव
५. स्वातंत्र्यवीर आत्माराम सन्तु भोसले
६. स्वातंत्र्यवीर बाबाजी भुजंग भोसले
७. स्वातंत्र्यवीर राजू खंडू भोसले
८. स्वातंत्र्यवीर रघु मानाजी भोसले
९. स्वातंत्र्यवीर विठू हंगू भोसले
१०. स्वातंत्र्यवीर व्याकात्राव भोसले
११. स्वातंत्र्यवीर बिरबत कुणबी
१२. स्वातंत्र्यवीर अन्न नाथु
१३. स्वातंत्र्यवीर बाळकृष्ण
१४. स्वातंत्र्यवीर बारकू
१५. स्वातंत्र्यवीर भीमा
१६. स्वातंत्र्यवीर गानू बापू चव्हाण
१७. स्वातंत्र्यवीर कृष्णाप्पा गोपाल चव्हाण
१८. स्वातंत्र्यवीर महादेव चव्हाण
१९. स्वातंत्र्यवीर दामोदर आबाजी
२०. स्वातंत्र्यवीर दत्तू नथु
२१. स्वातंत्र्यवीर दामू सरमळकर
२२. स्वातंत्र्यवीर नारायण देसाई
२३. स्वातंत्र्यवीर पांचाली गोविंद देसाई
२४. स्वातंत्र्यवीर राघोबा देसाई
२५. स्वातंत्र्यवीर देवाजी शिरसाठ
२६. स्वातंत्र्यवीर देवजी गायकवाड
२७. स्वातंत्र्यवीर गानू सावंत
२८. स्वातंत्र्यवीर गणेश महाराज
२९. स्वातंत्र्यवीर गणू सखाराम.
३०. स्वातंत्र्यवीर हरिभाऊ गरबेद
३१. स्वातंत्र्यवीर विठू गवळी
३२. स्वातंत्र्यवीर हनुमंत घाटगे
३३. स्वातंत्र्यवीर संत साली गोपाल
३४. स्वातंत्र्यवीर गोविंद
३५. स्वातंत्र्यवीर गोवर्धन
३६. स्वातंत्र्यवीर गोविंद महार
३७. स्वातंत्र्यवीर गोविंद विठू
३८. स्वातंत्र्यवीर गोविंद गोविंद
३९. स्वातंत्र्यवीर हरी
४०.स्वातंत्र्यवीर देवजी हिंदालकर
४१. स्वातंत्र्यवीर होनाजी
४२. स्वातंत्र्यवीर रघु जाधव
४३. स्वातंत्र्यवीर सुभाना बापू जाधव
४४. स्वातंत्र्यवीर जयराम राजे
४५. स्वातंत्र्यवीर शिवाजी अभिमन्यु
४६. स्वातंत्र्यवीर बाजी जोरेकर
४७. स्वातंत्र्यवीर अन्नाशशश नथु
४८. स्वातंत्र्यवीर गणाजी कबरे
४९. स्वातंत्र्यवीर अन्न बापू कदम
५०. स्वातंत्र्यवीर राम कदम
५१. स्वातंत्र्यवीर रावजी काळजी कदम
५२. स्वातंत्र्यवीर गोपाल कार्सोवकर
५३. स्वातंत्र्यवीर जिल्लू कोचारकर
५४. स्वातंत्र्यवीर गोपाल कोकमकर
५५. स्वातंत्र्यवीर मान्या कोळी
५६. स्वातंत्र्यवीर बोंबी कोकमकर
५७. स्वातंत्र्यवीर विठू सातवजी कुंभार
५८. स्वातंत्र्यवीर गिरवार कुणबी
५९. स्वातंत्र्यवीर जवाहर कुणबी
६०. स्वातंत्र्यवीर हैबतराव आप्पा महाडिक
६१. स्वातंत्र्यवीर विठू बहिरू महल्ले
६२. स्वातंत्र्यवीर अप्पा मालवणकर
६३. स्वातंत्र्यवीर नरसिंह माने
६४. स्वातंत्र्यवीर मावजी
६५. स्वातंत्र्यवीर मावजी धुमाळ
६६. स्वातंत्र्यवीर म्हसकर रावजी लिंगोजी नाईक
६७. स्वातंत्र्यवीर तात्या मोहिते
६८. स्वातंत्र्यवीर लिंबा भवानी मोरे
६९. स्वातंत्र्यवीर मोहन
७०. स्वातंत्र्यवीर भीमा नाईक
७१. स्वातंत्र्यवीर बी.वाय नाईक
७२. स्वातंत्र्यवीर गंगा एक्का नाईक
७३. स्वातंत्र्यवीर नारोजी लीन्गाजी नाईक
७४. स्वातंत्र्यवीर सोमिया जत्रा नाईक
७५. स्वातंत्र्यवीर नालाजी वारादिकीर
७६. स्वातंत्र्यवीर नाना चिलोजी
७७. स्वातंत्र्यवीर व्यंका पवार
७८. स्वातंत्र्यवीर बापू पाइप्कर
७९. स्वातंत्र्यवीर पांडू सिंगीकर
८०. स्वातंत्र्यवीर भाऊ कान्जोरा पाटील
८१. स्वातंत्र्यवीर भाऊ हरजी पाटील
८२. स्वातंत्र्यवीर भिल्लू अत्त्या पाटील
८३. स्वातंत्र्यवीर गरिबदास पाटील.
८४. स्वातंत्र्यवीर इत्तु पाटील
८५. स्वातंत्र्यवीर खुशाल गोविंद पाटील
८६. स्वातंत्र्यवीर मावजी अर्जुन पाटील
८७. स्वातंत्र्यवीर पांडू धोंडी पाटील
८८. स्वातंत्र्यवीर त्र्यंबक हरी पाटील.
८९. स्वातंत्र्यवीर जीवासा भीरु पाटील
९०. स्वातंत्र्यवीर रामजी जगताप
९१. स्वातंत्र्यवीर राम परब
९२. स्वातंत्र्यवीर रामराव
९३. स्वातंत्र्यवीर भिकाजी रावनेकर
९४. स्वातंत्र्यवीर गोपाल साळवी
९५. स्वातंत्र्यवीर साधू
९६. स्वातंत्र्यवीर सन्तु चंदू
९७. स्वातंत्र्यवीर बाबाजी सावंत
९८. स्वातंत्र्यवीर गणू सावंत
९९. स्वातंत्र्यवीर मनु अप्पा सावंत
१००. स्वातंत्र्यवीर पुताजी बाबुराव सावंत
१०१.स्वातंत्र्यवीर त्र्यंबक सावंत
१०२. स्वातंत्र्यवीर विश्राम सावंत
१०३. स्वातंत्र्यवीर नारायण पिराजी शिंदे
१०४. स्वातंत्र्यवीर दोन्द सावंत
१०५. स्वातंत्र्यवीर राम रघु शिंदे
१०६. स्वातंत्र्यवीर बापू नारोजी थोरात
१०७. स्वातंत्र्यवीर तुकाराम कृष्णाजी
१०८. स्वातंत्र्यवीर रघु त्र्यंबक
१०९. स्वातंत्र्यवीर बालाजी विलोबा
११०. स्वातंत्र्यवीर बाबाजी विठा
१११. स्वातंत्र्यवीर विठोबा
११२. स्वातंत्र्यवीर विठोबा जुनकर
११३. स्वातंत्र्यवीर वित्ठू
११४. स्वातंत्र्यवीर वित्तू बाबा आणि
११५. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



हे सर्वजण आहेत, अंदमानातील काळ्यापाण्याच्या शिक्षेचे कैदी बबन फाले, नागपूर यांनी लिहिलेल्या "क्रांतीधाम" या पुस्तकातील माहिती!

लोकापर्यंत अजूनही न पोचलेले सत्य. लेखक स्वतः २९ वर्षे अंदमान निकोबार येथे शिक्षण विभागात नोकरीला होते. त्यांना तिथे जी माहिती मिळाली त्या आधारे त्यांनी "क्रांतीधाम" हे पुस्तक लिहिले आहे. वरील सर्वजण राजकीय कैदी आहेत.

काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेले महाराष्ट्रातील हे स्वातंत्र्यसैनिक. ते अंदमानात राहिले व अंदामानातच मेले. मग यांनाही आम्ही भारताचे "स्वातंत्र्यवीर"च म्हणणार. नाही का ?

त्यांना अंधारात ठेवले गेले, त्यांच्यावर अनन्वित जुलूम करून त्यांना छळण्यात आले, सक्तीने मजुरी करवून घेतली.

अशा या स्वातंत्र्यवीरांच्या स्मृतीस त्रिवार अभिवादन..!

एक निवेदन : आपण ही पोस्ट सर्वत्र वितरित करा, कारण भारतातील वृतपत्रे आणि टीव्ही हे अजिबात दाखवणार नाहीत. तुम्ही आम्हीच प्रचारक आहोत.

# मुंबईतील मग्रूर गुजराथी–जैन समाज

मुंबईतले बहुतांश जैन–गुजराती–मारवाडी, हरयाणवी आणि काही मोजके उत्तर भारतातल्या मैदानी प्रदेशातले आहेत, हे अकृषक समुह आहेत. हे लोक पुर्वीपासून घाऊक वा किरकोळ व्यापार आणि विसाव्या शतकापासून वकिली, सीए, शेअरब्रोकर वगैरे व्यवसायात आहेत. हे खाण्यापिण्यात अत्यंतच कट्टर असतात. महाराष्ट्रातले जैन मुख्यत: शेतकरी आहेत, ते दख्खनचे नेटीव्ह आहेत. शाळा–कॉलेजात शिक्षण घेऊन, नोकऱ्या वगैरे करणारी त्यांची फार तर तिसरी पिढी असेल. यांची लोकसंख्या सांगली, कोल्हापूर, बेळगाव या तीन जिल्ह्यात एकवटलेली असली तरी, उर्वरीत महाराष्ट्रातही तुरळक आहे. पाटील, खोत, चौगुले, चव्हाण, उपाध्ये, मगदूम, देसाई वगैरे...

कर्मवीर भाऊराव पाटीलही जैन होते. व्ही. शांतारामही जैन होते. बाळासाहेब पाटील अल्पसंख्यांक मंत्री होते. सध्या यड्रावकर पाटील, प्रकाश आवाडे, राजू शेट्टी आमदार आहेत. 'जैन' आणि 'मराठी' अशी विभागणी हास्यास्पद तर आहेच; पण, अज्ञानदर्शकही आहे. लिखीत मराठी भाषेच्या प्राचीन पुराव्यापैकी मानला जाणारा एक शिलालेख (चामुंडराये करवियले) श्रावणबेळगोळला गोमटेश्वराच्या मुर्तीजवळ कोरलेला आहे.

महाराष्ट्रभर विखुरलेला जैन समाज आणि मुंबई परिसरातील गुजराती–जैन समाज यामध्ये प्रचंड फरक आहे. महाराष्ट्रभरातील मराठमोळा जैन समाज, अन्य समाजांसोबत स्वतःला जोडून आहे. मात्र, मुंबईतील बहुतांश गुजराती–जैन समाज मग्रूर झालेला आहे. मराठी माणसांना फ्लॅट नाकारणं, मांसाहारावरुन वारंवार त्रास देणं, पर्युषणपर्वात सगळ्यांनाच मांसाहारापासून रोखणं, ते नाटक आधी एक दिवस होतं, आता आठवड्याभरापर्यंत पोहोचणं, मराठी माणसांशी तुच्छतेने वागणं, आता कबुतरखान्यावरुन सुरु असलेला तमाशा आपण पाहतोच आहोत... फडणवीस आणि सद्य सरकार त्यांच्यासोबत आहे, त्यामुळेच तर त्यांची गुर्मी अधिकच वाढलीये. उपाय शोधावा लागेल!

आम्ही टीका–टिप्पणी करत असतो, ती या मुंबई परिसरातील बहुतांश मग्रूर गुजराती–जैनांवर. ही बाब महाराष्ट्रातील बाकीच्या मराठमोळ्या जैन समाजाने समजून घ्यावी. ही टीका–टिप्पणी त्यांच्यासाठी नसते.

मुंबईमधील जैन समाजाखेरीज, आणखी एका वर्गवारीमधील मारवाडी–जैन समाज महाराष्ट्रात वास्तव्य करुन




आहे, जो साधारण दीड शतकापूर्वी महाराष्ट्रात आला आहे. हा प्रामुख्याने खेडोपाडी स्थायिक झालेला छोटा व्यापारी आहे. या समाजानेदेखील मराठी संस्कृतीशी जुळवून घेतलेले आहे. अनेक मराठी सणांत जसे की पोळा, गणपती, दसरा, संक्रांत होळी वगैरे, हा समाज सहभागी होतो. या समाजालादेखील मराठी माणसांच्या मांसाहाराबद्दल आक्षेप नाही, जरी तो स्वतः संपूर्ण शाकाहारी असला तरी... साधारणपणे, माळ घातलेल्या वारकरी समाजाची मांसाहाराकडे बघण्याची जी दृष्टी असते, त्याच वृत्तीने हाही समाज बघतो.

मात्र, हा समाज आणि मुंबईमधील जैन समाज यांच्यात एकशे ऐंशी अंशाचे अंतर आहे. यांच्यावर तोडगा काढला नाही; तर, यांच्या धारणांच्या अतिक्रमणाचा परीघ नक्कीच रुंदावत जाईल. हे माझे ठाम मत आहे.

**तरीदेखील काही प्रश्न विचारावे वाटतात...**

त्यांची इतकी दादागिरी?

ते म्हणतात, आम्ही शाकाहारी आहोत, आम्ही राहतो तिथे कोणी मांसाहार करता कामा नये...

ते म्हणतात, आमच्या पर्वाच्या काळात शहरात, राज्यात मांसाहारी पदार्थ विकू नका...

ते म्हणतात, आमचं मंदिर अनधिकृत असलं तरी, ते पाडता कामा नये...

ते म्हणतात, कबुतरखाने बंद करु नका, त्यांना आम्ही दाणे टाकणारच...

ते मोर्चे काढतात, सरकारवर दबाव आणतात, राज्य सरकारही झुकतं. उच्च न्यायालयाच्या आदेशाने बंद झालेले कबुतरखाने, सरकारच्या सुचनेने सुरु होतात. त्यांच्याच दबावामुळे, अनधिकृत मंदिर पाडणाऱ्या महापालिका अधिकाऱ्याची बदली होते.

मलबार हिल भागातील मांसाहारी रेस्टॉरंट दिसेनाशी होतात. ताडदेवच्या महापालिका मंडईतील मच्छी मार्केट बंद करा, या मागणीसाठी ते मुंबई हायकोर्टात गेलेच आहेत. मराठी हिंदू मतदारांनो थाळ्या वाजवा...

(ब्रॅड–डी, रवींद्र पोखरकर, राहुल पुंगालिया आणि संजीव साबडे यांच्या, कमेंट–पोस्टचा हा एकत्रित मजकूर... कडवट असलं तरी, वास्तव मांडणारं प्रकटन)

*....समीर गायकवाड*

# निवडणुकांची मते मोजणारे महत्त्वाचे असतात!

– कालपर्यंत पाकिस्तानला (याच पाकिस्तानशी, 'सिंदूर' लावून दुबईत, अमित शहांच्या मुलाच्या BCCIचं नुकसान व्हायला नको, म्हणून भारत क्रिकेटचा सामना खेळणार) 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताची राफेल विमाने पाडायला थेट मदत करणारा आणि आपली भूमी बळकावणारा चीन...फक्त, मानसरोवर–यात्रेच्या 'वाटाण्याच्या अक्षता' लावून आज अचानक 'मैत्रीच्या विवाहवेदी'वर उभा करता येतो?

– लाल चीनला 'लाल आँखे' दाखवण्याच्या राणाभीमदेवी थाटात गर्जना करता करता, अचानक एकदम चीनची 'गळाभेट'?...जणू काही शहाण्या झालेल्या मुलासारखा चीन, लडाखमधल्या बळकावलेल्या भारतीय–भूभागातून माघार घेतोय की, काय? ...मग, पं. नेहरुंना शिव्याशाप द्यायचा, अंधभक्तांना काय अधिकार?

– या नियोजित चीन–भेटीमागे, अदानींच्या आर्थिक–हितसंबंधांची काळजी घेणं आहे की, दोस्तीत 'गद्दारी' करणाऱ्या 'ट्रम्प तात्यां'ना फुकटची 'हूल' देण्याचा प्रयत्न? ...की, ५०% टॅरिफमुळे अमेरिकन–निर्यात थंडावल्यास, ती सगळी चीन स्विकारुन भारताचा चीनशी असलेला निर्यातीचा आतबट्ट्याचा व्यवहार जरा संतुलित करु पहाणार आहे??

– चीनकडून आयात होणारे 'बारीक आँखोंवाले गणेशजी' म्हणत...एकाच वेळेस श्रीगणेश–दैवताचा आणि चिनी जनतेसह चीनच्या अध्यक्षांचाही घोर अपमान करणाऱ्या पं. मोदींचे डोळे उघडले म्हणायचे की, चीनमधून आयात होणाऱ्या गणेशमुर्तिंचे 'डोळे मोठे' झाले म्हणायचे?

– चीनमधून आयात होणाऱ्या गणेशमुर्तिंसह होळीच्या रंगांपर्यंत...विदेशी मालावर बंदी घालण्याचं आवाहन करणारे पं. मोदी व त्यांचे गोबर–गणेश अंधभक्त...ट्रम्प तात्यांनी अगदी लाथाडल्यानंतर अमेरिकी आयातमालावर, अमेरिकी–समाजमाध्यमांवर आणि एकूणच अमेरिकी–कंपन्यांवर बंदी घालण्याचं आवाहन कधि करणार?

– भारताची परदेशनीति नेमकी कोण चालवतो, कोण ठरवतो...जयशंकर, अजित डोवाल (या दोघांचीही मुले परदेशी–नागरिक असल्याची वदंता आहे)...की, मुकेश अंबानी? सध्या, मुकेश अंबानींच्या "ORF" (Observer Research Foundation) वरुन मोदी–अंधभक्तच मोठा गदारोळ निर्माण करत आहेत, म्हणून!

– रशियावरील अमेरिकी–निर्बंधांनंतर रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करुन नेमका कोणाचा एक लाख कोटींहून अधिक रुपयांचा फायदा झाला...भारतीय जनतेचा की, मुकेश अंबानींचा? पं. मोदी म्हणतात तसा, तो भारतीय जनतेला झाला म्हणावा; तर, पेट्रोल–डिझेल बिलकूल कधि स्वस्त झालेलं नाही!

– तेव्हा, वरील पार्श्वभूमीवर, एवढं निश्चित म्हणावं लागेल की, ''वोट चोर, गद्दी छोड'' या राहुल गांधींनी छेडलेल्या 'लोकशाही–बचाव' आंदोलनावरुन जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवण्याची, ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर चीन भेटीची पं. नरेंद्र मोदींची खेळी, दुर्दैवाने यशस्वी ठरल्यास...उथळ व धेडगुजरी वर्तनाने देशाच्या आर्थिकनीतिसह परदेशनीतिचा 'चुथडा' करणाऱ्या भाजप–संघीय सरकारला निवडणुकीतून 'धडा' शिकवण्याची संधि... भाजपसाठी जादूई करामत करणाऱ्या EVM–मतपेटीच्या माध्यमातून 'मतचोरी' केली जात राहून, कायमची हिरावून घेतली जाईल...मग, भारतीय–जनतेला रशियाच्या क्रूरकर्मा हुकूमशहा जोसेफ स्टॅलिनचे उद्गार आठवतील, ''निवडणुकीत मतं देणारे महत्त्वाचे नसतात...तर, मत मोजणारे महत्त्वाचे असतात!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# एक जागतिक रंगमंच, असाही रंगलेला...मध्ययुगीन युरोपमधल्या 'गेम ऑफ थ्रोन्स'सारखा...!!!

– नरेंद्र मोदींनी जो बायडेन यांच्या कार्यकाळात (वर्ष २०२१-२०२५) डोनाल्ड ट्रम्प यांची तीव्र इच्छा असूनही सरळ त्यांची भेट नाकारत त्यांचा भयंकर अपमान केला होता ( त्याचं कारण, तेव्हा अमेरिकन 'ORF'चे प्रमुख व परराष्ट्र-व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांचे पूत्र ध्रुव जयशंकर...अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीतील नरेंद्र मोदींच्या आपल्याविरुद्धच्या ''अब की बार, ट्रम्प सरकार'' वगैरे अत्यंत उथळ व सवंग प्रचार-मोहिमेनं प्रचंड संतापलेल्या व निवडणुकीत अनपेक्षित विजयी होऊन अध्यक्ष बनलेल्या जो बायडेन...यांच्या नाकदुऱ्या काढण्याच्या मोहिमेत प्रचंड व्यस्त होते म्हणूनच)...

**– डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यातच नव्हे; तर, आखाती देशात ट्रम्प यांच्या भेटीदरम्यान मुकेश अंबानी न चुकता हजर असतात...जेव्हा, त्या शपथविधी समारंभाला अपमानास्पदरित्या पं. नरेंद्र मोदींना जाणिवपूर्वक डावललं जातं...थोडक्यात, आमंत्रण कसंही करुन पदरात पाडून घेण्यासाठी अमेरिकत ठाण मांडून बसलेले एस. जयशंकर व त्यांचे अमेरिकेत** 'ORF'चे (Observer Research Foundation...**भारत-अमेरिकेदरम्यान 'लॉबिंग' करण्यासाठी धीरुभाई अंबानींनी स्थापन केलेली गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या बुद्धिजीवी-प्रभावी लोकांची संस्था) प्रमुख असलेले पूत्र ध्रुव जयशंकर यांची मोहिम सपशेल अयशस्वी ठरते.**

– आजतागायत अनेकवेळा ''मीच भारत-पाकिस्तान युद्ध थांबवलं'' म्हणत आणि अलिकडेच मोदी ट्रम्प यांना वॉशिंग्टनमध्ये भेटायला गेले असताना...व्हाईट-हाऊसमध्ये ट्रम्प यांनी स्वतः तर जाणे सोडाच; उलट साधारण दर्जाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी मोदींच्या स्वागतासाठी पाठवलं...पुढे पत्रकार-परिषदेत मोदींच्या तोंडावरच ''डॉलरशी समांतर अर्थव्यवस्था तयार होतेच कशी... 'ब्रिक्स' (BRICS), चालताच कामा नये...मी ब्रिक्स बंद करुन टाकणार आणि भारत आमच्यावर खूपच जास्त कर लावतो'', अशी मुक्ताफळं उधळत नरेंद्र मोदींनी केलेल्या आपल्या व्यक्तिगत अपमानाची, ट्रंप यांनी सव्याजच नव्हे; तर, चक्रवाढ व्याजाने दामदुप्पट परतफेड केल्यानंतर... हे 'अपमानपर्व' अथवा 'संगीत मानापमान नाट्य' इथेच थांबायला, काहीच हरकत नव्हती.

...पण, ५०% टॅरिफ लागू होण्याच्या दिवशीच, 'शस्त्रसंधी मीच घडबली' हे ३५व्या वेळी ठासून सांगताना ''मी 'शस्त्रसंधीसाठी 'नो ट्रेड' ची २४ तास मुदतीची धमकी देताच; ती मुदत संपण्यापूर्वीच पुढच्या ५ तासात मोदींनी सपशेल शरणागती पत्करली'', असं धक्कादायक व भारतासाठी अत्यंत लांच्छनास्पद विधान केलं...आणि, त्याच सुमारास सर्वात मोठ्या अमेरिकन चॅनेल 'फॉक्स-न्यूज'वर घसरत्या भारतीय-रुपयाची भयंकर खिल्ली उडवली जात होती, हे जरा विशेषच!

**– मुकेश अंबानी यांचीच रिलायन्स, अमेरिकन-निर्बंधांना डावलून रशियाचं स्वस्त तेल 'आयात' करत हजारो कोटींचा 'आयता' नफा उकळत रहाते आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतविरोधी 'टॅरिफ-युद्धा'त २५% अधिकच्या टॅरिफचा (एकूण ५० टक्के) भुर्दंड भारताला सोसावा लागतो...**

**हाच तेलाचा 'तडका', ट्रम्प यांचं मस्तक भडकण्याचं प्रमुख कारण ठरतं.**

– २०१४च्या निवडणुकीत ज्यांच्या विमानातून खुलेआम प्रचार मोदींनी केला; त्या गौतम अदानींच्या नियंत्रणाखालील विविध बंदरांमध्ये हजारो कोटींचे मादक-पदार्थ सापडतं रहातात.

हिंडेनबर्ग-अहवालाचा धुरळा अजून शमला नसतानाच अमेरिकन गुंतवणूकदारांच्या पैशातून उभ्या रहात असलेल्या भारतातील सौरऊर्जा-पुरवठ्याचं कंत्राट चढ्यादराने अदानी ग्रीन एनर्जीला मिळवून देण्याच्या फसवणुकीच्या व भ्रष्ट प्रकरणातील अमेरिकन न्यायालयाने गौतम अदानी व पुतण्या सागर अदानींना अटक करुन अमेरिकेत आणण्यासाठी सहा महिन्यांपूर्वी पाठवलेले अटक-वॉरंट भारत सरकारकडून अजूनही त्यांना बजावले गेले नसल्याचा गंभीर मुद्दा, अमेरिकन न्यायालयात नुकताच उपस्थित झालाय.

**– विविध गुन्हेगारी स्वरुपाच्या आरोपांमुळे अमेरिका व युरोपमधून कर्जाचा पुरवठा थांबल्याने अदानी ग्रुपला भारतीय बँका व वित्तसंस्थांकडून वाढीव कर्ज मिळण्यासाठी भारत सरकारतर्फे मोठा दबाव आणला गेल्याने...अदानी ग्रुपवरच्या एकूण कर्जाची मात्रा, एकदम वाढून २ लाख ६५ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचलीय.**

– अशातच, दिडदमडीच्या बीजेपी ट्रोल-आर्मीकडून (विशेषतः 'मेंदूविक्या' गोदी-मिडीयाचा 'गधा' असलेल्या अर्णव गोस्वामीकडून) 'Deep State' वगैरे शेलकी विशेषणं वापरुन अंबानींच्या 'ORF'वर आणि स्वतः अंबानी-परिवारावर जोरदार चिखलफेक व तद्नंतर, सीबीआय / ईडीकडून अनिल अंबानींच्या निवासस्थानी धाडी पडतात.

आपल्या 'मित्रपरिवार-भांडवलदारां'च्या हितासाठीच केवळ (Crony-Capitalists) देशाच्या आर्थिकनीतिसह परदेशनीतिचा बोजवारा उडवणाऱ्या भाजप-संघीय सरकारची ही... ''वोट चोर, गद्दी छोड'' या राहुल गांधींनी छेडलेल्या 'लोकशाही-बचाव' आंदोलनावरुन जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवण्याची ही जबरदस्त खेळी समजायची की, वास्तवातला 'गेम ऑफ थ्रोन्स' वा 'रशियन-रुलेट' समजायचा...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# हेमंत करकरे यांच्या 'खुना'मागील वास्तव...

रॉ या भारतीय गुप्तचर यंत्रणेची जबाबदारी पत्करून युरोपात जाण्यापूर्वी शहीद हेमंत करकरे हे तीन वर्षे चंद्रपूरच्या जिल्हा पोलीस प्रमुखाच्या पदावर होते. त्या तीन वर्षात त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलवादी चळवळीचा पूर्णपणे बिमोड केला होता. त्या काळात त्यांचे आणि माझे व्यक्तीगत संबंध मैत्रीच्या स्तरावर आले होते. हेमंतभैय्या आणि त्यांच्या पत्नी सौ. कविता या अनेकदा माझ्या घरीही त्या काळात आल्या होत्या. इथून सुरू झालेली आमची मैत्री पुढे माझ्या कादंबरीवर बेतलेल्या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या सोहळ्याला ते मुंबईतही हजर होते. दरम्यानच्या काळात त्यांच्या कुटुंबातील जवळजवळ साऱ्यांचाच माझा व्यक्तीगत संबंध जुळून आला होता.

मुंबईतील ताज हॉटेलवर झालेल्या २६/११ च्या पाकिस्तानी संघटनेच्या हल्ल्याच्या वेळी हेमंत करकरे आणि त्यांचे सहकारी त्याचा बंदोबस्त करण्याच्या कामावर राबत राहिले. कसाब आणि त्याचा सहकारी हे ताज सोडून उत्तरेच्या दिशेने निघाले



तेव्हा हेमंत करकरे आणि त्यांचे दोन वरिष्ठ सहकारी एका जीपमधून त्यांचा माग काढत गेले. ही कारवाई सुरू होण्याआधी त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी अंगात चिलखत चढविलेल्याचे दृष्य मी दूरदर्शनच्या वाहिनीवर गोव्यात असताना पाहिले होते. त्यानंतर काही तासांनीच दूरदर्शनने हेमंत करकरे आणि त्यांचे इतर दोन सहकारी कसाबच्या गोळ्यांना बळी पडून ठार झाल्याचे वृत्त दिले. तोही प्रकार मी दूरदर्शनवर पहात होतो.

हेमंतभैय्यांच्या त्या शहादतीने त्यांच्या कुटुंबाएवढीच माझीही व्यक्तीगत हानी झाली आहे. नंतरच्या काळात त्यांच्या पत्नी कविता यांची आणि माझी नांदेडला जाणाऱ्या विमानात भेट झाली तेव्हा मी त्यांना कोल्हापूरला भेट देण्याची आणि तिथल्या किसनवीर साखर कारखान्यात उभारलेल्या हेमंतभैय्यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन येण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांच्यासोबत माझ्या कुटुंबातल्या एक झालेल्या कविता महाजन या कवयित्रीही त्यांच्यासोबत होत्या. नंतरच्या काळात कविता वहिनींना राष्ट्रपतींच्या हातून हेमंतभैय्यांच्या नावाचे अशोकचक्र स्वीकारतानाच मी दूरदर्शनवर पाहिले.

हा सारा इतिहास आज उगाळण्याचे कारण, हेमंत करकरे यांचा मृत्यू कसाबच्या गोळ्यांनी झाला नसून मुंबईच्या पोलीस दलातील काही दुष्ट राजकीय प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांनी गोळ्या झाडून केला होता, ही गोष्ट उघड होणे हे आहे. हे प्रकरण न्यायालयात असताना न्यायाधिशांनी आपल्या निकालपत्रात यासंबंधी केलेली नोंद अशी की, करकरे यांना कसाबच्या गोळ्या लागल्या असत्या तर, त्या एकतर ...पृष्ठ क्र. ५ वर

...पृष्ठ क्र. ४ वरुन

छातीवर, पाठीवर वा डोक्यावर लागल्या असत्या. मात्र पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये आढळलेली गोष्ट ही की, त्यांच्या मानेतून पोटाच्या दिशेने रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या झाडून त्यांना खून करण्यात आला. त्याचवेळी त्यांचे इतर दोन ज्येष्ठ सहकारीही ठार झाले. पुढे कसाब पकडला गेला आणि सुशीलकुमार शिंदे हे भारताचे गृहमंत्री असताना त्याला फासावर लटकवण्यात आले. या सबंध घटनाक्रमात आजवर उघड न झालेल्या काही गोष्टी अशा आहेत.

हेमंत करकरे यांची हत्या मानेतून गोळ्या घालून करण्यात आली, ही न्यायालयात उघड झालेली गोष्ट जगासमोर आली नाही आणि त्यावेळी सरकारचे वकील असलेले ॲड. उज्वल निकम यांनीही ती कुणाला सांगितली नाही आणि न्यायाधीशांचे ते आकलनही त्यांनी किंवा सरकारच्या कायदे विभागाने केंद्राला व तेव्हाच्या राज्यकर्त्यांना कळू दिले नाही.

त्यावेळी महाराष्ट्राचे पोलिस महानिरीक्षक असलेले व तेलगीकांड उकरून काढल्यामुळे साऱ्या देशात आदराचा विषय झालेले एस.एम. मुश्रीफ यांनीच अलिकडे 'हू किल्ड करकरे' या नावाचे पुस्तक लिहून ते एक वर्षापूर्वी प्रकाशित केले. त्याच्या अनेक भाषांमध्ये आवृत्त्या निघाल्या. मात्र त्याच्या मराठी आवृत्तीचा प्रकाशन समारंभ करण्याचे धाडस मुंबई-पुण्यातल्या एकाही साहित्य संस्थेला वा विचारवंतांच्या संघटनेला झाले नाही. हे प्रकाशन कॉ. गोविंदराव पानसरे यांनी कोल्हापुरात समारंभपूर्वक घडवून आणले. आता त्याची चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे आणि त्याचे महत्त्वाचे कारण, उज्वल निकम यांना भारतीय जनता पक्षाने मुंबईतील लोकसभा क्षेत्राचे दिलेले तिकीट हे आहे.

हेमंत करकरे यांनी मृत्यूपूर्वी मालेगाव हत्याकांडाचा तपास पूर्ण केला होता आणि त्यात प्रज्ञा ठाकूर या तथाकथित साध्वीला तिच्या सहकाऱ्यांसह अटक करून तुरुंगात डांबले होते. त्याला जोडूनच करकरे यांनी हैदराबाद व पंजाबातील अशाच हत्याकांडांचा तपास लावला होता व त्यातील आरोपी जेरबंद केले होते. प्रज्ञा ठाकूर आणि जेरबंद केले गेलेले इतर सर्व आरोपी हे संघ परिवाराशी संबंधित होते आणि आहेत. यातल्या प्रज्ञा ठाकूरला भारतीय जनता पक्षाने भोपाळचे तिकीट देऊन तिला लोकसभेवरही गेल्यावेळी निवडून आणले होते. हेमंत करकरे यांचा तपास जारी राहिला असता तर प्रज्ञा ठाकूर, तिचे सहकारी आणि तिच्याशी संबंध असलेली, अभिनव भारत ही संघाशी संबंध असलेली संघटना, हे सारेच जगासमोर आरोपी म्हणून उभे राहिले असते, असे मुश्रीफ यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे.

या साऱ्या आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या कामी ॲड. उज्वल निकम यांनी महत्वाची भूमिका बजावली ही गोष्टही त्यांनी उघड केली आहे.

मुंबईवरील २६-११ च्या हल्ल्याआधी १९ -११ लाच असा हल्ला होणार असल्याची माहिती अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेने भारताच्या हेरखात्याला दिली होती. त्यावेळी पाकिस्तानातून निघालेल्या हल्लेखोरांच्या बोटी नेमक्या कुठे आहेत ते अक्षांशरेखांशानिशी अमेरिकेने या संघटनेला कळविले होते. मात्र, या संघटनेच्या प्रमुखपदी असलेल्या प्रभाकर आलोक या अधिकाऱ्याने त्याविषयीची माहिती पोलिस यंत्रणा, महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकारपर्यंत न पोहोचविण्याचेच काम केले. हा प्रभाकर आलोक नावाचा इसम पुन्हा संघाचाच कार्यकर्ता म्हणून काम करीत होता हे येथे उल्लेखनीय. त्याच्या या नाकर्तेपणामुळे मुंबईवर हल्ला झाला आणि त्यात १६८ लोक मरण पावले. शिवाय तेवढ्याच संख्येने अनेकजण जायबंदीही झाले. नंतरच्या काळात याच हल्ल्याचा पुढचा भाग म्हणून जो घटनाक्रम झाला, त्यात करकरे आणि त्यांचे सहकारी मृत्यू पावले. या सबंध घटनेची आणि प्रभाकर आलोक या अधिकारी इसमाची पूर्ण माहिती असतानाही, त्यावेळचे सरकारी वकील उज्वल निकम यांनी ती दडविली आणि संबंधित यंत्रणांना सावध केले नाही, असेही मुश्रीफ यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. मुश्रीफ यांनी उघड केलेल्या या माहितीची पुष्टी तेव्हाच्या केंद्र सरकारच्या मुख्य सचिवांनीच नंतरच्या काळात केली ही गोष्ट महत्त्वाची आहे.

लष्कर ए तोयबा या संघटनेचे हे हल्लेखोर पाकिस्तानातून निघून मुंबईच्या सीमेपर्यंत येत असतानाच्या सात दिवसातच इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राने या हल्ल्याविषयीची तीन विस्तृत बातमीपत्रे प्रकाशित केली होती हे येथे महत्त्वाचे आहे. जी गोष्ट वृत्तपत्रांना समजते, ती सरकारी यंत्रणांना आणि सरकारी वकिलाला मिळत नाही, या गोष्टीवर ज्या भाबड्यांना विश्वास ठेवायचा असेल त्यांनी तो ठेवायला हरकत नाही. मात्र, त्या साऱ्यांविषयी माझ्या मनात केवळ एक दयेची आणि काहीशा संतापाची भावना आहे आणि तीच साऱ्या देशवासियांच्याही मनात असावी. हा सारा घटनाक्रम पाहिला की, करकरे आणि त्यांच्या साथीदारांसह, मुंबईत मृत्यू पावलेल्या १६८ स्त्रीपुरुषांच्या मृत्यूला, प्रभाकर आलोक हा आयबी या गुप्तचर संघटनेचा प्रमुख आणि न्यायालयात सरकारी बाजू मांडणारे उज्वल निकम हे त्याला जबाबदार आहेत, याच निष्कर्षावर साऱ्यांना यावे लागते.

करकरे हयात राहिले असते तर, आपल्या हस्तकांनी केलेल्या देशातील मुसलमानविरोधी कारवाया उघड झाल्या असत्या व कदाचित आपलीही नावे पुढे आली असती, अशी भीती मनात बाळगणाऱ्या संघप्रणित संस्थांचा आणि व्यक्तींचा या प्रकारातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग अशावेळी लक्षात घेणे आवश्यक आहे. या प्रकाराने केवळ काही लढाऊ अधिकारीच मारले नाहीत; तर, त्याने देशातील पोलिस यंत्रणेचे, गुप्तचर खात्याची, वकीलीच्या व्यवसायाची आणि केंद्र सरकारच्या सावधगिरीचीही सारी प्रतिष्ठा धुळीला मिळविली. हेमंत करकरे यांच्या हौतात्म्याचे अपराधीपण मग कुणाकडे जाते हेही अशावेळी लक्षात येते.

हा देश शहीदांविषयी नेहमीच कृतज्ञता बाळगत आला आहे. महाराष्ट्राच्या अनेक शहरांत, मी हेमंत करकरे यांच्या नावाचे चौक पाहिले आहेत. प्रत्यक्ष चंद्रपूर या माझ्या शहरातील एका चौकालाही त्यांचे नाव दिले आहे.

या साऱ्या घटनाक्रमात आरोपी म्हणून जेरबंद होऊ शकणाऱ्या संघप्रणित संस्था आणि व्यक्ती यांचा स्वतः मूक राहून बचाव करणाऱ्या उज्वल निकम यांना भारतीय जनता पक्षाने लोकसभेचे तिकीट देणे, हा उपकाराची परतफेड करण्याचा किंवा त्याच्या वकिलीची फी देण्याचा प्रकार आहे एवढेच यातून ध्यानात येते.

काही काळापूर्वी 'न्या. लोया यांचा खून कुणी केला? असा प्रश्न विचारणारे पुस्तक, माझे पत्रकारस्नेही निरंजन टकले यांनी लिहून प्रकाशीत केले. त्यात न्या. लोयांनी अमित शहांना आपल्यासमोर हजर होण्याचे आदेश दिल्याचा व त्या आदेशाकडे दुर्लक्ष करून न्यायालयाचा अपमान करण्याचा प्रकार अमित शहांनी केला असे अनेक पुराव्यानिशी लिहिले आहे. परंतु सत्तेविरुद्ध न बोलण्याच्या आजच्या स्थितीत त्या पुस्तकाची कोणी फारशी दखल घेतली नाही. त्या पुस्तकाच्या वाट्याला आलेले हे दुर्दैवी दुर्लक्ष मुश्रीफ यांच्या 'करकरे यांची हत्या कोणी केली?' या पुस्तकाच्या वाट्याला येऊ नये एवढीच एक इच्छा व्यक्त करून करकरे यांना श्रद्धांजली वाहणे एवढेच आपल्या हाती शिल्लक राहिले आहे.

काही दिवसांपूर्वी बलराज मधोक या जनसंघाच्या पूर्वाध्यक्षांचे दडवून ठेवले गेलेले आत्मचरित्र कुणीतरी अर्धवट स्वरुपात लोकचर्चेत आणले. त्यात 'संघाला रक्ताची चटक आहे' असे मधोकांनी म्हटल्याचे अनेकांच्या वाचनात आले आहे. हेमंत करकरे यांची हत्या याच परंपरेतील असेल, तर ते या देशाएवढेच हिंदू धर्माचेही दुर्दैव म्हणावे लागेल. त्याचवेळी या पुस्तकाने महाराष्ट्रासह साऱ्या देशाला त्याच्या राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव करून देण्याची कामगिरी बजावावी आणि जनतेने या पुस्तकाने प्रकाशात आणलेले सत्य समजून घ्यावे, एवढीच साऱ्यांना विनंती आहे.

जाता जाता एक गोष्ट नमूद करायची ती ही, की व्यक्तिशः माझा उज्वल निकमांशीही संबंध राहिला आहे. त्यांच्याशी मी अनेकदा फोनवरून काही प्रश्नांबाबत चर्चा केली आहे. त्यांना भाजपने तिकिट दिले तेव्हा मी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांनीही माझा आभार मानणारा संदेश मला पाठविला. त्यामुळे या लिखाणात त्यांच्या विषयीचा आकस नाही, मात्र हेमंत करकरे यांच्या शहादतीचे सत्यत्व साऱ्यांसमोर यावे ही माझ्या मनातील भावना आहे आणि ती साऱ्यांनी समजून घ्यावी ही माझी विनंती आहे.

*– सुरेश द्वादशीवार*

(१५ ऑगस्ट-२०२५)
आता उठवू सारे स्मशान....
शहिदांच्या राखेतूनी फुलवू,
देवी-स्वतंत्रतेचं गान...!!!

तिजोरीत बंदी जो तो...
चाले मग्रूर इथे दलाली!
खेळ मुजोरीत मतचोरीचा,
मतपेटीतून ऐसा चाले...
राजा बोले लगटून,
दळ ते तत्पर हाले...
साव बनूनी आयोग 'शर्विलक',
हात जोडूनी तो उभा ठाके!

'चौकीदार चोर' म्हणावा की,
संमेलन म्हणू चोरांचं?
....की, न्यायालय बंद दारांचं!
चोरांची वाराणसी न् काशी,
रोज संन्याशाला फाशी!

काळजातून जनांच्या होऊ द्या
पार किती धार-कट्यारी...
लोकशक्तिच्या होता अशा,
त्या जीर्णनिष्प्रभ ढाली...
स्वातंत्र्यासाठी रक्तवर्णी पुन्हा,
टिळा लावूया भाळी....
पुन्हा टिळा लावूया भाळी!

...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# शूट द मेसेंजर...

विपरीत घटना, वाईट बातमी घेऊन येणाऱ्या शिपायाचा, शिरच्छेद करण्याचा हुकूम देणाऱ्या राजांच्या गोष्टी आपण ऐकलेल्या असतात. आधुनिक जगातील महान लोकशाही देशात, अमेरिकेतदेखील असा राजा राज्य करत आहे... त्या राजाचे नाव आहे, डोनाल्ड ट्रम्प!

**अमेरिकेत दर महिन्याच्या पहिल्या दिवशी, मागच्या महिन्यात अर्थव्यवस्थेत किती रोजगार तयार झाले याची आकडेवारी, ''ब्युरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स'' या शासकीय संस्थेतर्फे नियमितपणे प्रसिद्ध केली जाते. तशी ती जुलै महिन्यासाठी, एक ऑगस्टला प्रसिद्ध केली गेली. ती आकडेवारी अमेरिकेन अर्थव्यवस्थेमध्ये रोजगार निर्मिती मंदावत असल्याचे दाखवत होती. आधीचे महिनेदेखील फार काही रोजगार–निर्मिती दाखवत नव्हती.**

**''अमेरिकन अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था आणण्यासाठी, आपण जी धोरणे आखत आहोत, एक मोठे महत्त्वाकांक्षी ''बिग ब्यूटीफुल बिल'' आपण काँग्रेसमधून पास करुन घेतले मला माहित आहे, अर्थव्यवस्था चांगले काम करत आहे आणि हा कोणता ब्युरो सांगत आहे की, रोजगार–निर्मिती वाढत नाहीये आणि कमी होतेय?'' अधिकारी/मंत्र्यांच्या बैठकीत ट्रम्प यांनी विचारले, ही आकडेवारी कोण प्रसिद्ध करते? त्यांना संस्थेचे नाव सांगितल्यावर, कोण आहे त्या संस्थेचा प्रमुख? असं विचारल्यावर, 'Erika McEntarfer' या आहेत सर... असं त्यांना सांगण्यात आलं.**

ट्रम्प यांच्या काही सल्लागारांनी हे सांगण्याचा प्रयत्न केला की, आपण जे उपाय योजित आहोत, त्याची फळे मिळायला अजून एक–दोन महिने लागतील. थोडी सबुरी दाखवावी लागेल. तेवढ्यात अजून एक सल्लागार ट्रम्प यांच्या कानात पुटपुटला. सर, त्या एरिका मॅडम बायडेन यांनी नेमलेल्या आहेत... झाले, ट्रम्प यांचे पित्त खवळले. हा डेमोक्रॅटिक पक्षाच्या कट–कारस्थानाचा भाग आहे. तडकाफडकी ट्रम्प यांनी, एरिका मॅडमना बडतर्फ करायचा आदेश काढण्याचा हुकूम केला आणि सही सुद्धा केली.

अमेरिकेत स्थूल अर्थव्यवस्थेबाबत आकडेवारी गोळा करण्याचे काम, जवळपास 'ऑटोमेटेड मोड'वर नेले गेले आहे. मानवी हस्तक्षेपाला फारसा वाव नाही. हे ट्रम्पसकट सर्वांना माहीत आहे. त्यामुळे संस्थेचा प्रमुख, औपचारिकरित्या आकडेवारी जाहीर करतो एवढेच. हा ट्रम्प आणि एरिका यांच्यातील मुद्दा नाहीये, सिस्टीमचा मुद्दा आहे. आपल्या नागरिकांच्या जिव्हाळ्याचा मुद्दा!


**'ब्युरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स'च्या प्रमुखपदी जी कोणी नवीन व्यक्ती येईल, त्याला ट्रम्प यांना पसंतीस उतरेल अशीच आकडेवारी जाहीर करण्याचे प्रचंड दडपण असेल. ती व्यक्ती पहिल्या दिवसापासून बदनाम झालेला असेल. तो जी काही आकडेवारी जाहीर करेल, ती कितीही खरी असली तरी, ती शिजवलेलीच असणार असा ग्रह अनेकांच्या मनात तयार होणारच होणार. यामुळे 'ब्युरो ऑफ लेबल स्टॅटिस्टिक्स' या अनेक दशके कार्यरत असणाऱ्या, शासकीय संस्थेची विश्वासार्हताच धुळीस मिळणार आहे. पण, आधुनिक राजांना त्याची फिकीर नाही.**

अजून एक विरोधाभास. या सगळ्यात अमेरिकन अर्थव्यवस्थेमध्ये हवी तशी रोजगार निर्मिती होत नाहीये आणि अमेरिकन अर्थव्यवस्था मंदावण्याची चिन्हे आहेत, या सत्यावर सार्वजनिक चर्चाच होत नाहीयेत. सर्व हुकुमशहा नारसिस्ट असतात. हुकुमशाहीप्रवृत्ती ही, राजकीय विचारधारा नाही, तो मानसिक रोग आहे. ते राष्ट्रप्रेम वगैरे बोलतात; पण, ते फक्त स्वतःच्या प्रेमात असतात. ट्रम्प बघा ना, त्यांना अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर चर्चा नको आहेत. कोणी आकडेवारी बनवली यावर ते जीव घेतील. हुकूमशहा, टीका करणाऱ्या व्यक्तींवर खुन्नस काढतो हे माहित होते; पण, त्याची धोरणे त्याला अपेक्षित परिणाम दाखवत नाहीयेत, हे दाखवून देणाऱ्या वस्तुनिष्ठ, नॉनह्युमन आकडेवारीवरदेखील खुन्नस काढतो.

**ही पोस्ट अमेरिकेबद्दल असली तरी, तिचा उद्देश हा, अधिक मूलभूत गोष्टींकडे लक्ष वेधणे असा आहे. लोकशाहीप्रणाली जिवंत ठेवण्यासाठी, सच्ची आकडेवारी किती महत्त्वाची असते? हुकूमशहा सच्च्या आकडेवारीला का घाबरत असतील? आणि, आपल्या स्वतःच्या देशातील शासकीय आकडेवारी गोळा करणाऱ्या संस्था/जाहीर होणारी आकडेवारी याबद्दल, वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे हा आहे !!!**

***....संजीव चांदोरकर***

# तुम्हाला केतन पारीख आठवतोय..? माधोपूरा बँक आठवतेय..?




तो केतन पारीख, ज्याने १६०० कोटींचा शेअर्स घोटाळा केला. त्यात ती माधोपूरा बँक सपशेल बुडाली. CBI ने चौकशी केली, केतन पारीखला अटक झाली. काही महिन्याने त्याने जामिनासाठी अर्ज केला, त्याला जामीन मंजूर झाला..!

त्या जामीनाविरोधात माधोपूरा बँकेने आणि CBI ने आव्हान दिले...

हे आव्हान(अपील) बँकेने मागे घ्यावे आणि जामीनाचा मार्ग सुकर व्हावा म्हणून माधोपूरा सहकारी बँकेच्या एका संचालकाने या केतन पारीखकडून अडीच कोटी रुपयांची लाच घेतली होती...

ही लाच घेतली गेल्याचा अहवाल अर्ज गुजरातचे तत्कालीन DGP (क्राईम) श्री. कुलदीप शर्मा यांनी गुजरात राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव श्री. सुधीर मांकड यांना पाठवला.

हा अहवाल गुजरात सरकारकडून चक्क हरवला गेला. (२०१९ ला राफेल खरेदीची महत्वाची कागदपत्रेदेखील भारत सरकारकडून हरवली गेल्याची माहिती सर्वोच्च न्यायालयात दिली गेली.आणि आश्चर्य म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने देखील यांवर काहीही भाष्य केले नाही.)

असो. आता माधोपूरा सहकारी बँकेचा तो लाचखोर संचालक कोण होता तुम्हाला ठाऊक आहे ?

त्याचं नाव अमित अनिलचंद्र शहा, हो तेच ते भारताचे विद्यमान केंद्रीय गृहमंत्री...!

विश्वास बसत नाही..? इंडियन एक्सप्रेस! हिंदुस्तान टाइम्स !, द हिंदू ! आणि प्रमुख वृत्तपत्रांच्या वेबसाईट किंवा लिंकवर जा. २५-२६-२७ जुलै २०१० ची वर्तमानपत्रे धुंडाळा..!

विश्वास बसेल.

देश का विकला जात आहे, या प्रश्नाचे उत्तर मिळाले असेल अशी आशा. आम्ही तुम्हाला पुन्हा ती लिस्ट दाखवू इच्छित नाही की, ज्यामध्ये देशातील जवळपास २८ गुजराथी लोकांनी वेगवेगळ्या बँकांना मागील ७ वर्षांत जवळपास १० लाख कोटी रुपयांचा चुना लावला आहे. यांना कोण वाचवत आहे? हे पण तुम्हाला आता चांगलेच माहीत झाले आहे .

देशातील अश्या महत्वाच्या बाबींवरून इतरत्र लक्ष विचलित करण्यासाठी सध्या हिंदू -मुस्लिम वाद तयार करून, देशातील सौहार्दाचे वातावरण कोण दूषित करीत आहे व का करीत आहे हे पण आपणास चांगलेच माहीत आहे.

अंधभक्तांना आम्ही काहीच बोलणार नाही कारण बोलून चालून ते अंधभक्त आहेत, त्यांना सगळा देश जरी विकला गेला तरी, काहीच फरक पडत नाही, त्यांच्या डोक्यात या धूर्त सनातन्यांनी मुस्लिमांची अशी काही भीती बसवली आहे की आपण त्यांना कितीही पुरावे देऊन देश बरबाद होत आहे हे सांगितले तरी, ते मुस्लिम कसे देशाला मुस्लिम - देशात (Muslim Country) रूपांतर करीत आहे हे मीठ मिरची लावून सांगत बसतात. त्या अंधभक्तांना हे पण माहीत नाही की, या देशावर मुस्लिमांचे ६५० वर्षपेक्षा जास्त काळ सत्ता असून सुद्धा देश मुस्लिम देश झाला नाही तर, हे आता कसे शक्य आहे? हे अंधभक्त पूर्णपणे या धूर्त लबाड लोकांच्या आहारी गेलेले आहे. (Hypnotise) पण तुम्ही मात्र समजदार आहात, तुमची सदविवेकबुद्धी जागेवर आहे तेव्हा आता देश वाचविण्याची जबाबदारी आता तुमचीच आहे! लोकशाही ही फक्त आता कागदावर शिल्लक आहे.

**जय भारत , जय संविधान ...**

***प्रदिप भालेकर***

(आर. टी. आय. कार्यकर्ता)

# हिंदू देवतांवर आणि अंधभक्तांवर, सावरकरांनी ओढले शाब्दिक आसूड!''

वि. दा. सावरकर लिखित, 'विज्ञाननिष्ठ निबंध' या ग्रंथात, हिंदूंच्या देवलसी वृत्तीमुळे अंधश्रद्धेच्या गर्तेत लडबडणाऱ्या अंधभक्तांवर आणि देवाच्या अस्तित्वावर कोरडे ओढले आहेत. असे वक्तव्य जर आजच्या कोणी पुरोगाम्यांनी केले असते; तर, हिंदुत्ववाद्यांनी ''आमच्या भावना दुखावल्या'' म्हणून टाहो फोडत कोल्हेकुई सुरू केली असती आणि पोलिसात एफ.आय.आर. दाखल करण्यासाठी पुढे सरसावले असते... पण आता?



**सावरकर म्हणतात, ''साधारणतः सन १३०० ते १६०० पर्यंतच्या काळास महाराष्ट्राच्या इतिहासाचे, भारताच्या इतिहासाचे का म्हणाना, एक पान कल्पिले तर, त्यात ह्या ईश्वरी अधिष्ठानाच्या दृष्टिकोनातून केवढे आश्चर्य दिसून येते ते पाहा. प्रथमदर्शनीच ज्ञानेश्वरांसारख्या महायोग्याचे दर्शन घडते. रेड्याकडून त्यांनी वेद म्हणविले. भिंतीला चालविले, हरिनामाच्या गजराने महाराष्ट्र दणाणून सोडले. ते ज्ञानेश्वर, ते निवृत्ती, ते सोपान, ती मुक्ता आपल्या अलौकिक दैवी संपत्तीची महाराष्ट्रभर नुसती लूट करवीत होते. जिकडे तिकडे दैवी चमत्कार...** त्यांच्या मागोमाग नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, दामाजीपंत, सावता माळी, रोहिदास चांभार, चोखा महार, सारे जीवनमुक्त, साऱ्यांस प्रत्यक्ष पांडुरंग प्रसन्नपणे भेटीगाठी देत आहेत, घेत आहेत. त्यांच्या मागोमाग ते एकनाथ, ते तुकाराम ब्राह्मणवाड्यापासून महारवाड्यापर्यंत महाराष्ट्रात घरोघर साधुसंत, घरोघर देवाचे येणे–जाणे, प्रत्यही सकाळी कोण्यातरी अलौकिक चमत्काराची ताजी बातमी. आज काय रेडा वेद बोलला, उद्या दामाजीपंतांसाठी प्रत्यक्ष देवाने विठू महाराचा वेष घेऊन, बादशहाच्या भरदरबारी दंडाच्या द्रव्याच्या राशीच्या राशी ओतल्या. तोच नवीन बातमी की, ते द्रव्य बादशहा स्पर्श लागताच त्यांची फुलांची रास झाली. कधी देव रोहिदासाच्या घरी जोडे शिवीत आहेत, कधी एकनाथाच्या घरी पाणी भरीत आहेत, कधी जनाबाईचे दळण दळीत आहेत, कधी नामदेवाबरोबर जेवीत आहेत, कधी पंढरीचे देऊळचे देऊळ गरकन् फिरत आहे, आज चोख्या महाराच्या पंगतीस बसून पांडुरंग प्रेमभावाने मिटक्या मारीत आहेत, उद्या चोख्यास गाडीला बांधून फरफटत ठार मारण्याची शिक्षा, दुष्ट लोकांनी दिली असता, स्वतः श्रीकृष्ण येऊन ते जू हातांनी धरुन अडवीत आहेत. कोणाच्या दाराशी दत्तात्रेय आपली कुत्री घेऊन उभे आहेत; तर, कोणाच्या हाती ग्रंथ लिहिण्यास विठोबा लेखणी उचलून देत आहेत. मेलेली माणसे जियंत होत आहेत; तर, जिवंत माणसे जिवंतपणी पुरुन घेऊन समाधिस्थ होत आहेत. माणसा–माणसांशी देव बोलत आहेत, हसत आहेत, जेवत आहेत, मूर्तीमान प्रत्यक्ष रामचंद्र कथा ऐकत आहेत, मूर्तीमान प्रत्यक्ष हनुमान संतामागे उभे राहून कथेस साथ देत आहेत. त्या काळची ही संतचरित्राची बाजू वाचीत असता असे वाटते की, ही महाराष्ट्र भूमि त्या काळी माणसांची भूमि नसून, देवांचीच भूमि झालेली होती. महाराष्ट्र हेच त्या काळी देवांचे राहते घर झालेले होते, वैकुंठ नव्हते!''

**''पण हाय! हाय! काय दुष्ट योगायोग पहा... ज्ञानेश्वरांच्या भगवंताच्या अधिष्ठानाचा पूर्ण पाठिंबा असणाऱ्या, त्यांच्या आश्रयदात्या त्या रामदेवरावास, अल्लाउद्दीन विंध्याद्रि उतरुन आल्याची बातमीदेखील पुरती कळली नव्हती, तोच त्याने थेट देवगिरीवर चढाई केली नि रामदेवरावाच्या हरिभक्त अशा हिंदूंच्या अफाट सैन्याचा त्या हरिद्वेष्ट्याने चक्काचूर उडविला. ज्ञानेश्वर, निवृत्ति, सोपान, मुक्ता, नामदेव, गोराकुंभार प्रभृती संतमहंत, घरोघर देवाशी हसत, जेवत, बोलत असता, भगवंताचे अधिष्ठानच काय; पण, महाराष्ट्र भगवंताची प्रत्यक्ष राजधानी झालेली असता, तिकडे विहार–बंगाल–अयोध्या, काशीत हिंदू राज्यश्री मुसलमानांच्या घोड्यांच्या टापांखाली तुडविली जात होती. रजपूत वीरांच्या झुंडीच्या झुंडी रणांगणात कतल केल्या जात होत्या. आज का उद्या येवढाच प्रश्न, पण विंध्याद्रि उतरुन, तो मुसलमानी प्रलय दक्षिणेवर कोसळणार हे स्पष्ट झाले होते.''**

''इकडे विठूरायाची नगरी भगवंताच्या नामघोषाने दणाणतच होती, संतांचे जाळे गायोगाय पसरत होते, त्यांच्या घरात प्रत्यक्ष देव येऊन जोडे शिवीत होते, मडकी घडवीत होते, दळणे दळीत होते, बादशहाची खंडणी भरीत होते. जपजाप्य, व्रतवैकल्ये, योगयाग, नामसप्ताह, स्नानसंध्या याचा नुसता पर्वकाळ गजबजला होता. तिकडे मुसलमानांच्या एक सोडून पाच पादशाब्या हिंदूंच्या उरावर नाचत होत्या. हिंदूंच्या घरांतून 'देवलदेवी' रावण पळवीत बाटवीत होते. पण प्रत्येक देवास दोहोपेक्षा जास्त हात असूनही, त्यांपैकी एकानेही अल्लाउद्दिनाचा वा मलिकंबराचा हात धरला नाही. बादशहाची खंडणी भरली; पण, ''तू हरिद्वेष्टा! माझ्या हरिभक्तांपाशी खंडणी मागणारा तू कोण?'' म्हणून गर्जत दाढी ओढून त्यास हिंदू सिंहासनावरून खाली खेचले नाही. जनाबाईचे दळण दळणाऱ्या कनवाळू देवाने, त्या दळणापेक्षाही कोटीपटीने हिंदुराष्ट्रास ज्या दळणाची आवश्यकता होती, ते दळण दळण्यास सरसावून, त्या हरिद्वेष्ट्यांच्या राजसत्तेसच आपल्या क्रोधाच्या जात्यात दळून–भरडून निर्दाळून टाकले नाही. पुण्यपुरुष एकनाथ भगवंताचे अधिष्ठान संपादिलेले, त्यांच्या तोंडावर जाता–येता पापी यवन थुंके. **हिंदूंची हजारो तरुण मुलेमुली गुलाम होत असता, राजकन्या दिल्लीच्या राजवाड्यात मुसलमानांच्या दासी झाल्या असता, रोहिदासाच्या घरी जोडे शिवीत बसणाऱ्या कृपाळू देवास त्यांची करुणा आली नाही. जे जे देऊळ, ते ते काशी–रामेश्वरापर्यंत पाडले, जे जे देऊळ पाडले त्याची त्याची मूर्ती मशिदीची पायरी केली... पण, देवास त्या मुसलमानी अत्याचाराचा राग आला नाही! पण इकडे कोणी हिंदू एखादा नारळाचा नवस जरी फेडायचा विसरला ना, किंवा एखादा हिंदू गावबहिरोबास वार्षिक बोकड मारावयास चुकला ना, की तोच देव काय रागावे. ह्या हिंदू माणसाचा कुळक्षय होई वा या गावावर महामारीच्या गाढवाचा नांगर फिरे.''**

''तेव्हा ज्यांना ज्यांना आपल्या चळवळीस ऐहिक यश हवे, त्याने आमच्या पक्षास न्याय आहे, आमच्या पक्षास देव आहे, सत्य आहे यास्तव तो आमचा पक्ष विजयी होणारच अशा वल्गना करण्याचे आणि आंधळ्या निष्ठेत निश्चिंत राहण्याचे सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादी न लागता, **'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे,' इतकेच काय ते खरे मानावे. दुर्बल पुण्याईही पंगु होय, हे विसरु नये. नुसत्या एकशेआठ तर काय, पण अकराशेआठ सत्यनारायणांच्या पूजा केल्या तरी, ऐहिक यश मिळणार नाही.** कारण, ते चळवळीच्या भौतिक सामर्थ्यावरच काय ते अवलंबते. असत्यनारायणाचे पूजकही ह्या जगात वारंवार यशस्वी होतात. रामास हराम समजणारेही जे यश मिळवू शकतात, ते ऐहिक यश ज्यास हवे, त्याने ते अद्ययावत्वैज्ञानिक सामर्थ्य संपादावे. चळवळीत ते सामर्थ्य असले तर, भगवंताच्या अधिष्ठानावाचून काही अडत नाही. ते सामर्थ्य नसले तर, भगवंताच्या अधिष्ठानासाठी कोटी–कोटी जप केले तरी, ऐहिक यश मिळत नाही, हाच सिद्धांत!''

(सूचना : सावरकरांच्या अनुयायांनो, हे वाचून जर तुमच्या भावना दुखावल्या असतील तर, सावरकरांना जबाबदार धरा बरं का!)

*– समाजमाध्यमातून साभार*

# कार्ल मार्क्स ते टेक्नो-फ्यूडलिझम : कामगार-मुक्तीचा प्रवास

## भाग १

''कामगार, इतिहासाचा नायक आहे...कामगार, संपत्तीचा निर्माता आहे'', हा 'नायक आणि निर्माता' आज भांडवली-व्यवस्थेत 'निर्माल्या'हूनही कःपदार्थ झालेला, भारतात (विशेषतः महाराष्ट्रात) दिसतो. ''महाराष्ट्रात निमर्ाण झालेली संपत्तीच महाराष्ट्राच्या व महाराष्ट्रातल्या मायमराठी माणसाच्या मुळावर आलीय'' किंवा ''वारसाहक्काने धर्मसंप्रदायाची 'घराणेशाही' चालवणाऱ्या 'आध्यात्मिक-उद्योगपतीं'च्या नादाने आणि सार्वजनिक गणेशोत्सव-पूजा-दहीहंड्या गरबे, भंडारे व क्रिकेटसारख्या खेळांच्या 'फाजील-उत्सवप्रियते'नं...महाराष्ट्रातला तरुणवर्ग पद्धतशीररित्या ग्लानीत ढकलला गेलाय'', असं जेव्हा 'धर्मराज्य-व्यासपीठा'वरुन सातत्यपूर्ण प्रतिपादीत केलं जातं...तेव्हा, ''कामगार जितकी जास्त संपत्ती निर्माण करतो, तितका तो स्वतः गरीब होत जातो'' किंवा ''धर्म, ही अफूची नशा आहे'', वगैरे कार्ल मार्क्सची सत्यदर्शी विधानं; वेगळ्या पद्धतीने 'मराठी-जगण्या'च्याच आसाला भिडल्याचं जाणवल्याखेरीज रहात नाहीत! महाराष्ट्रात शहरी-निमशहरी भागात लाखो-हजारो 'अर्धरोजगारां'च्या सहकुटुंब आत्महत्या होत असतात, ज्या आत्महत्यांची गणितीसंख्या व त्यात रुतलेली भीषण करुणा, ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपेक्षाही जास्त मोठी, जास्त गहरी असते; पण, रक्तपिपासू-निर्दय-शोषक 'भांडवली-व्यवस्था' (Vampire-State System) ती वस्तुस्थिती झाकून ठेवते...जाणिवपूर्वक त्या कामगारांच्या आत्महत्यांना शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रमाणे ''अर्धरोजगार-कामगारांची आत्महत्या'', असं 'ब्रॅण्डिंग' होऊ देत नाही...कारण, पुन्हा ते आणि तेच, जे विविध धर्मसंप्रदाय पोसून संतप्त मराठी-जनमनसावर 'आध्यात्मिक' थंडगार विलेपन करण्यामागे असतं... ते म्हणजेच, ''मराठी-नैराश्याचा विस्फोट होऊन 'विद्रोहाची आग' भडकू नये, हेच!''

...तेव्हा, याआगोदरच खूप उशीर झालेला असला; तरीही, संजय आवटेंच्या लेखाच्या निमित्ताने...''प्रथमच 'खाउजा' धोरणापश्चात अवतरलेली 'कंत्राटी-कामगार पद्धत', ही गुलामगिरी व नव-अस्पृश्यता लादणारी भांडवली-अवदसा आहे आणि देशासाठी सीमेवर लढू पहाणाऱ्या नवतरुणपिढीचं शोषण करु पहाणारी 'अग्निवीर', ही लष्करी-भरतीची 'भाजपकृत' नवी टूम म्हणजे, कंत्राटी-पद्धतीतल्या कृष्णविवराचं एक पिल्लू आहे'', हे 'धर्मराज्य पक्षा'ने तळमळीने लावून धरलेले मुद्दे, ऐरणीवर येऊ पहातायत...याचं समाधान मानण्यावाचून सध्यातरी गत्यंतर नाही...

''उंदराप्रमाणे 'कंत्राटी' सापळ्यात अडकलेला तरुण कंत्राटी कामगार-कर्मचारीवर्ग'', ही आजच्या दुर्दैवी महाराष्ट्राची नवी ओळख बनलीय!

शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' या नायकाच्या ''टू बी ऑर नॉट टू बी''(To be or not to be) या स्वगताच्या परिभाषेत बोलायचं तर, ''लग्न करावे की, न करावे'' (To marry or not to marry) या विवंचनेत अवघ्या महाराष्ट्राचा शिक्षित-अर्धशिक्षित नवतरुणवर्ग सध्या आहे. संपूर्ण कॉर्पोरेटीय-व्यवस्थेत गुन्हेगारी-संगनमताचं घट्ट जाळं विणून त्यात अडकून तडफडणाऱ्या नवतरुण कामगारांना पहात विकृत आनंद भोगणारे भोगविलासी 'HR-IR व्यवस्थापक मंडळी', कंत्राटी-पद्धत लादण्यात यशस्वी झाल्याबद्दल स्वतःला फार कर्तृत्त्ववान समजत स्वतःची पाठ थोपटू लागलेत... ''मानवी-रक्ताघामाची चटक लागलेल्या या जंगली वाघांचं आता थोडक्यात समाधान होणारं नव्हतं!'' फक्त, प्रासंगिक अधिकच्या मागणीसाठीच केवळ कंत्राटी-कामगार न वापरता, नियमित स्वरुपाच्या 'कायम' कामगारांच्या जागीदेखील, हेच 'कंत्राटी-गुलाम' वापरण्याचं भांडवली-कटकारस्थान पुढे रचलं गेलं...तशाही, कंत्राटी-पद्धतीनं युनियन्स कमजोर होत चालल्याच होत्या व कामगार पुरवण्याचं कंत्राट घेणारे गावगुंड राजकारणी आयतेच हाताशी होते. त्यामुळे, 'कायम-कामगारां'ची भरतीच अलिकडे साफ रोडावलेली, असं अत्यंत संतापजनक व अस्वस्थ करणारं कंपनी-कॉर्पोरेटीय चित्र आहे...भरीला भर म्हणून नरेंद्र मोदी सरकारने कामगार-चळवळ पूर्ण नेस्तनाबूत करण्यासाठी तीन काळ्या कामगार-कायद्यांनी बनलेली 'काळी कामगार-संहिता' (Black Labour-Code) आणलेली!



**मूळ कार्ल मार्क्स विषयाकडे वळताना....**

मानवी प्रतिभा-संस्कृतीच केवळ नव्हे; तर, मानवी अर्थव्यवहारांचा इतिहास, चळवळी, क्रांत्या-युद्धे-महायुद्धे, राष्ट्रांच्या राजकीय-व्यवस्था आणि निसर्ग-पर्यावरणावर त्याचा होत जाणारा अपरिहार्य परिणाम...एवढं व्यामिश्र वैचारिक-प्रभावक्षेत्र असणाऱ्या कार्ल मार्क्सला 'बुद्धी आणि प्रतिभे'चा जागतिक दीपस्तंभ म्हणून गणलं गेलं, यात आश्चर्य ते काय? ''रुसो, व्हॉल्टेअर, बॅरन होलबॅक, गॉटहोल्ड लेसिंग, हेन्रिच हेनी, जॉर्ज हेगेल यासारख्या लेखक/तत्त्वचिंतकांचं बेमालूम मिश्रण केल्यानंतर, जो दशांगुळे उरतो...तो म्हणजे कार्ल मार्क्स'', असंही म्हटलं गेलंय. ''दास कॅपिटलचे तिन्ही खंड विद्यार्थ्यांना नव्याने शिकवताना व वाचताना, त्यांच्या आकलनाचे नवोन्मेष प्रत्येक वेळेस पहाटसमयी उमलणाऱ्या फुलासारखे नजरेसमोर नव्याने उलगडत जातात'', असंही कुणा अभ्यासकाने म्हणून ठेवण्याएवढा कार्ल मार्क्स अद्वितीय विचारवंत होय.

'प्ल्यूरसी'सदृश (Pleurisy) असाध्य रोगाचा शिकार असलेल्या कार्ल मार्क्सला श्वसनाला सतत त्रास होत असल्याने तरुणपणी सक्तिच्या लष्करी-प्रशिक्षणातून सूट द्यावी मिळाली होती व पुढे, दुर्धर असलेल्या त्या विकाराने त्याचा आयुष्यभर पिच्छाच पुरवला...अशात चिंतन, मनन, स्मरण दिवसेंदिवस अवघड होत चालल्याने त्याने प्रसंगी अल्कोहोल व सिगारेटमधून लेखनप्रवासासाठी कृत्रिम ऊर्जा मिळवण्याचा धोकादायक मार्ग पत्करला. तत्कालीन ब्रिटीश म्युझियममधील ग्रंथपालाने नमूद करुन ठेवलंय की, त्याने जेवढ्या सिगारेट्स ओढल्या; तो खर्चही भरुन येण्याएवढी, तो हयात असताना त्याच्या पुस्तकांची विक्री कधि झाली नव्हती. एकूणच, अल्कोहोल व सिगारेट ही त्याची व्यसनं म्हणून कमी आणि लेखनाचं 'इंधन' म्हणून खूप जास्त होती...एक असं 'इंधन', जे लेखनऊर्जा पुरवता पुरवता, त्याला आतून जाळून काढत होतं आणि त्यातूनच त्याच्या लेखनकार्याची काळाबरोबर जीवघेणी शर्यत सुरु झाली होती!

पौगंडावस्था संपून तारुण्यात प्रवेश करत असतानाच कार्ल मार्क्सला ''पारलौकिक जीवनापेक्षा ऐहिक जीवनाचं अपरिमित महत्त्व जाणवल्याने हबकून गेलेल्या त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकाने १७व्या वर्षी त्याच्या हातात शालेय-जीवन संपतानाचं प्रमाणपत्र (Leaving Certificate) देताना शेरा लिहून ठेवला होता, ''हा विद्यार्थी अत्यंत तेजस्वी प्रतिभेचा असला; तरीही, तो त्याच्या ऊतू जाणाऱ्या अंगभूत बौद्धिक-ऊर्जेच्या प्रचंड दडपणाखाली वावरतोय!''

प्रचंड बौद्धिक सामर्थ्य असलेल्या या नवयुवकाच्या लवकरच ध्यानात आलं की, या जगाला हळुवारपणे होत जाणाऱ्या सुधारणांची नव्हे; तर, एका मोठ्या मूलभूत स्वरुपाच्या क्रांतिची गरज आहे... आणि, फ्रेडरिक हेगेलच्या 'द्वंद्वात्मक-सिद्धांता'ने प्रेरित होत ''धर्म, ही समाजासाठी अफुची नशा आहे'', याचीही मनोमन खात्री त्याला झाली. भांडवलशाहीचा गुळगुळीत-चकचकीत पृष्ठभाग उचकटून त्याच्याखालील गरीबांना भरडून काढणाऱ्या यंत्रशक्तिला त्यानं उघडं पाडायला सुरुवात केली. फ्रेडरिक एंगेल्सने वर्णिलेल्या इंग्लंडमधील कारखान्यांमधून १६-१६ तास राबत फॉस्फरसच्या वाफा फुफ्फुसात गेल्यामुळे ठिसूळ झालेली हाडे व पाठीचा कणा वाकलेल्या लहान मुलांच्या आणि कापड-गिरण्यांच्या कोंदट, तंतूमय प्रदूषित हवेने खोकून खोकून खंगलेल्या कामगारांच्या दुःसह स्थितीने तो पार हादरुन गेला. कामगारांची कुटुंबच्या कुटुंबे निव्वळ जगण्यासाठी आपल्या आत्मसन्मानाशी तडजोड करत गुलामीत जगताना तो पाहू लागला...संपूर्ण भांडवलशाहीचा मनोरा साध्यासोप्या पण, अत्यंत नृशंस अशा, ''मानवी रक्ताघामाचं सोन्यात आणि जिवंत हाडामांसाच्या कामगारांचं निर्जीव 'भांडवला'त रुपांतरण करण्याच्या'' एका जादूई जैव-रासायनिक (lchemy) सुत्रावरच उभारलेला होता, हे विदारक सत्य त्यानं अचूक जाणलं. ज्याने, १६-१६ तास राबणाऱ्या कामगारवर्गाच्या 'शोषणमुक्ति'साठी प्राणांतिक लढा दिला...तो स्वतः अनन्वित दुःखयातना व जीवघेणी आजारपणं सोसत, ब्रिटीश-संग्रहालयाच्या ग्रंथालयात १६-१६ तास राब राब राबत 'दास कॅपिटल' नावाचं...अवघं जग बदलू पहाणारं, ऐतिहासिक व क्रांतिकारी 'कामगारांचं दास्यमुक्ति गान' लिहीत होता!

उर्वरीत भाग पुढिल अंकात

# देवेंद्रजी, आमदार नावाची (काही) बोकडं, कुणाच्या जीवावर एवढी माजलीयेत?

नुकतेच पावसाळी अधिवेशन संपले. या अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांवर किती चर्चा झाली? लोकांचे प्रतिनिधी, लोकांच्या प्रश्नावर किती भांडले आणि व्यक्तीगत मतभेदाचा तमाशा किती झाला? याचा लेखाजोगा नक्की मांडायला हवा. हे अधिवेशन केवळ राडेबाजीत संपून गेले. विरोधक निष्प्रभ झालेत, त्यामुळे सत्ताधाऱ्यांना माज आल्याचे चित्र आहे. सत्तेतले आमदार, मंत्री म्हणजे एकेक नमुना आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात इतक्या खालच्या दर्जाचे मंत्रीमंडळ कधीच नव्हते. काही अपवाद वगळता, सत्तेतले आमदार आणि मंत्री महाराष्ट्राची लाज काढणारे आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेचा वारसा उज्ज्वल आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, भाई उद्धवराव पाटील, एन.डी. पाटील, आचार्य अत्रे, एस.एम. जोशी, शरद पवार, गणपतराव देशमुख, विलासराव देशमुख, गोपिनाथ मुंडे, आर.आर. पाटील अशा अनेक नामांकीत लोकांनी विधानसभेचा लौकीक वाढवला. या विधानसभेत आजवर अनेक मान्यवरांनी आपल्या अभ्यासू वक्तृत्वाने, आपल्या जनतेप्रतीच्या तळमळीने विधानसभेची उंची वाढवली आहे. महाराष्ट्राच्या जनतेची छाती अभिमानाने फुलून यावी असे त्यांचे वर्तन होते. पण ''जिथे फुले वेचली तिथं गोवऱ्या वेचण्याची वेळ यावी'' असे आजचे चित्र आहे. **जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांच्यात झालेल्या राड्यावर बोलताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, आमदारांना माज आला असल्याचे वक्तव्य केले होते. पण, आमचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच सवाल आहे... देवेंद्रजी, ही आमदार नावाची बोकडं कुणाच्या जीवावर माजलीत? याचं तुम्ही आत्मपरिक्षण करणार का?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या वक्तव्यात तथ्य आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता, सत्तेतल्या आमदारांना माज आलाच आहे. काही आमदार नावाची बोकडं भलतीच माजली आहेत. होय, ही बोकडंच! विधानसभेच्या लौकीकाची ज्यांना पर्वा नाही, जनतेच्या प्रश्नांचे ज्यांना भान नाही, ते बेभान झालेत, बेफाम झालेत, कसेही बोलतायत, काहीही बोलतायत, त्यांना काय म्हणावं? कदाचित यांना बोकड म्हणणे, हा त्या बोकडाचांही अवमान ठरावा असे टूकार आणि थिल्लर वर्तन या आमदारांचे आहे. त्यांचा मस्तवालपणा महाराष्ट्राच्या विधानसभेच्या गौरवाला कलंकीत करणारा आहे. संजय गायकवाड यांनी, कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला ज्या पध्दतीने मारले तो प्रकार, आमदार बबन लोणीकर यांनी शेतकऱ्यांना उद्देशून वापरलेली भाषा, संजय शिरसाट यांची काही वक्तव्ये, मंत्री शंभूराज देसाई यांची विधानसभेतील भाषा, कृषीमंत्री कोकाटे यांचा माज, पायाला छप्पनजणांना बांधून फिरण्याची




भाषा करणाऱ्या चित्राताई, रोज नवनवीन वादग्रस्त वक्तव्य करणारे नितेश राणे, गोपिचंद पडळकर ही यादी अजून मोठी होईल. हे सगळं भयंकर आहे. हा सर्व प्रकार लोकांची मान शरमेने खाली घालणारा आहे. हे असले टुकार लोकप्रतिनिधी आपले आहेत, यावर विश्वास कसा ठेवायचा? असा प्रश्न पडतो.

आमदार जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांच्यातल्या राड्याने तर कहर केला. चक्क विधानसभेत गुंड आणले. पोलीस रेकॉर्डवरील गुंड विधानसभेत येतात आणि मारामारी करतात. हे चित्र जर विधानसभेतलं असेल; तर, राज्याची स्थिती काय असेल? विधानसभेत गुंड पोहोचत असतील आणि गुंड नेणाऱ्या लोकांवर काहीच कारवाई होणार नसेल, तर काय बोलायचं? जर देवेंद्र फडणवीस यांच्यात काही विवेक जीवंत असेल तर, त्यांनी याचा गांभीर्याने विचार करावा. आपण कशाला पाठबळ देत आहोत? कुठल्या प्रवृत्ती, कुठल्या विकृतींना ताकद देत आहोत? याचा विवेकाने विचार करावा. कोणतीही सत्ता शाश्वत नसते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर, खूप चांगले काम करण्याची संधी काळाने देवेंद्र फडणवीस यांना दिली होती. पण, सत्तेच्या उन्मादात फडणवीसांचा विवेक मेला आहे. त्यांना याचे भान नाही. ते चेले-चपाट्यांच्या गराड्यात अडकले आहेत. त्यांनी ठरवलं तर, ते महाराष्ट्राचे सोने करु शकतात. आपल्या कर्तृत्वाने राज्याच्या इतिहासात आपले स्थान शाश्वत करु शकतात. राज्याच्या विकासात खूप मोठे योगदान देऊ शकतात. महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून, इतिहासाने यशवंतराव चव्हाण यांची नोंद घेतली... पण, महाराष्ट्राचे नवशिल्पकार म्हणून आपली ओळख निर्माण करण्याची संधी काळाने फडणवीसांच्या पुढ्यात आणून ठेवली आहे. महाराष्ट्राचे नवशिल्पकार व्हायचं की, अनाजीपंत म्हणूनच रहायचं? याचा विचार फडणवीसांनी जरुर करावा. सामान्य जनता त्यांच्याबद्दल काय बोलते आहे? याचाही त्यांनी तटस्थपणे अभ्यास करावा. **सत्तेसाठी हपापलेल्या, त्यासाठी कुणाचेही तळवे चाटणाऱ्यांच्या कोंडाळ्यात देवेंद्र फडणवीस अडकले आहेत. ही गँग ''देवाभाऊ देवाभाऊ'' करते आहे. त्यांच्या अवतीभवती राहून ''देवाभाऊ देवाभाऊ'' करणारे 'गुप्तांगचोळे' म्हणजे, राज्याची जनता नव्हे, याचे भान फडणवीसांनी ठेवावे. अजूनही वेळ गेली नाही. ते महाराष्ट्राला सावरु शकतात आणि विकासाच्या उंचीवर नेऊ शकतात. त्यांनी या माजलेल्या मस्तवाल बोकडांना जरुर चाप लावायला हवा. त्यांचा माज उतरवून, त्यांच्या जबाबदारीचे भान त्यांना द्यायला हवे.**

विधानसभेतल्या राड्यावर, विधानसभेच्या अध्यक्षांनी कठोर कारवाई करायला हवी. पण, ते करतील असे वाटत नाही. विधानसभेचे अध्यक्ष असलेले राहुल नार्वेकर म्हणजे, मुख्यमंत्र्यांनी अध्यक्षपदावर बसवलेलं बुजगावणं आहे. त्यांना आत्मसन्मान नसेल; पण, आपण ज्या पदावर आहोत, त्याचा सन्मान राखला पाहिजे, याचे त्यांना भान आहे का? गौरवशाली वारसा असलेल्या ज्या सदनात आपण आहोत, त्या सदनाच्या परंपरेची तरी, त्यांनी लाज बाळगावी. त्याची लाज आणि बूज बाळगून आव्हाड-पडळकरांच्या राड्यावर कारवाई करावी. अशा प्रवृत्तीला पाठीशी घातले तर, भविष्यात विधानसभेत मुडदे पडतील याचे त्यांनी भान ठेवावे !!

*....दत्तकुमार खंडागळे*

ही आहे 'असलियत' तथाकथित 'उदारमतवादी' भांडवली-व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांची... जो शहाजोगपणे कामगार-कर्मचारीवर्गाने आठवड्याचे तब्बल ७० तास काम केले पाहिजे, असा क्रूर 'भांडवली-शंखनाद' करत होता! आपण सारी बावळट माणसं साधेभोळेपणाने नारायण मूर्ती, सुधा मूर्ती, सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन, नाना पाटेकर, लता मंगेशकर वगैरे एकेक रक्तपिपासू-निर्मम-शोषक भारतीय 'भांडवली-व्यवस्थे'च्या (Vampire-State System) पालखीचे भोई असणाऱ्यांना फारच डोक्यावर घेऊन नाचतो! कधी आपण शहाणे होणार?

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## तुम्ही कितीही महान असलात तरी....'माणूस म्हणून लहानच आहात

फार उशिरा सुचलेलं शहाणपण आहे हे...जेव्हा सचिन 'मुंबई' देशाची आहे म्हणाला होता, करोना-काळात चौथी पास 'नॉन-बायॉलॉजिकल' थापाड्या पंतप्रधानाच्या नादानं भोळ्या जनतेला 'टाळ्या आणि थाळ्या' वाजवायला सांगून गंडवत होता, क्रिकेटमधल्या निवृत्तीनंतरही जनसामान्यांवरील अन्याय-अत्याचार-शोषण वा सुखदुःखाविषयी पूर्णतया 'उदासीन' राहून अंबानी-अदानीसारख्या बड्या भांडवलदारांभोवती फेर धरुन नाचण्यात मग्न होता...तेव्हाच, ही 'भारतरत्न-वापसी'ची मागणी व्हायला हवी होती! मुळातूनच आपल्या कारकीर्दीत अमाप पैसा-प्रसिद्धी मिळवणाऱ्या कुठल्याही खेळाडू-कलाकारांना 'भारतरत्न'सारखा सर्वोच्च नागरी-सन्मान देणं, हा खरंतर अक्षम्य 'नागरी-अपराध' आहे व तो BJP/RSS द्वयीने नियम बदलून जाणिवपूर्वक केलेला आहे. अशा सेलिब्रिटींना आपल्या पंखाखाली घेत व अज्ञानी-भाबड्या जनतेसमोर आपल्या समर्थनार्थ पेश करतच जगभरातल्या 'भांडवली-व्यवस्था' आपला रक्तपिपासू-निर्मम-शोषक कारभार निर्वेधपणे चालू ठेवत असतात. सचिन, खेळाडू म्हणून कितीही 'महान' असला; तरी, माणूस म्हणून खूपच 'लहान' आहे...लता मंगेशकर, आशा भोसले, अमिताभ बच्चन, नाना पाटेकर वगैरे प्रभृती त्याच मालिकेतील एकेक नग!

# दहशतवाद्यांचे बॉम्ब...कोर्ट निकालांचे स्फोट...!!!

**लेखक : ज्ञानेश महाराव (ज्येष्ठ पत्रकार – संपादक)**

**५००/१००० रुपयांच्या नोटबंदीच्या निर्णयामुळे देशाबाहेरुन येणारा दहशतवाद बंद होणार होता. तरीही शेकडो जवानांचे आणि नागरिकांचे बळी घेणारे पुलवामा, उरी, पहलगाम यासारखे देशाला हरवणारे दहशतवादी हल्ले झालेच ना? हैदराबाद, मुंबई, मालेगाव येथे बॉम्बस्फोट करणारे आरोपी निर्दोष सुटलेच ना? ते कसे?**

दक्षिण भारतात तिरुवल्लूर नावाचे थोर संत इसवी सन पूर्व ३० ते २०० वर्षं या काळात होऊन गेले. ते हिंदू जातीवर्ण्य व्यवस्थेने कनिष्ठ ठरवलेल्या दलित समाजातले होते. त्यांनी संत कबीर यांच्यासारखं मानवता, समता यांचं समर्थन करणारं आणि जाती-धर्मभेद यातील व्यर्थता सांगणारं लेखन तमीळ भाषेत केलं. ते शैव, वैष्णव, बौद्ध आणि जैन धर्मीयांनी ''संतवचन'' म्हणून आपलं मानलंय. तिरुवल्लूर यांच्या अभंग-दोह्यांसारख्या रचनांचा मिळून ''तिरुक्कुलर'' नावाचा ग्रंथ तयार झालाय. हा ग्रंथ ''अरम'' (आचरण/सदाचार), ''परुल'' (सांसारिकता/धनवृद्धी) आणि ''इन्बम'' (प्रेम/आनंद) अशा तीन खंडांचा आणि १३३ अध्यायांचा आहे. ''भगवद्गीते'' खालोखाल जगातील प्रमुख भाषांत सर्वाधिक अनुवादित झालेला हा ''तिरुक्कुलर'' ग्रंथ आहे. त्यातील एका दोह्यात म्हटलंय- ''सत्याच्या नि न्यायाच्या मार्गातून विचलित होणाऱ्या राजाच्या राज्यात पाऊस पडणार नाही. जो राजा न्यायाने राजदंड हातात ठेवतो नि योग्य रीतीने राज्य चालवतो, त्याच्या राज्यात वेळेवर पाऊस पडतो. ज्या राजाला क्षमा माहीत नाही, जो नेहमी मर्मछेदी बोलतो, त्याचं भाग्य कितीही मोठं असलं, तरी त्याचं राज्य लवकरच संपुष्टात येतं!''

राजकारण करणाऱ्या आणि समजून घेणाऱ्या प्रत्येकाने मनन करुन स्वतःला तपासावे, असं हे संतवचन आहे. कारण, सध्या न्यायाचं पारडं सतत सत्तेच्या सोयीनं झुकतंय. मग तो मुंबईच्या ११ जुलै २००६ मध्ये झालेल्या लोकल रेल्वेतील भीषण बॉम्बस्फोटांचा निकाल असो; अथवा २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव (जिल्हा : नाशिक) मध्ये मशीद परिसरात झालेले बॉम्बस्फोट असोत; दोन्ही प्रकरणातील आरोपी ''पुरेशा पुराव्याअभावी निर्दोष'' सुटलेत. मुंबईच्या रेल्वे बॉम्बस्फोटांत १८९ लोकांचा मृत्यू झाला आणि ८०० हून अधिक लोक जखमी झाले होते. या प्रकरणातील सर्व १२ आरोपी तुरुंगात होते. ते बाराही जण मुस्लीम आहेत. त्यांची मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै (२०२५) रोजी निर्दोष म्हणून मुक्तता केली.

या उलटस्थिती मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाची होती. ''रमजान''च्या निमित्ताने मुस्लीम लोक मशिदीत ''नमाज अदा'' करण्यासाठी जात असताना हा बॉम्बस्फोट झाला. त्यात ६ जण ठार झाले आणि १०० हून अधिक लोक जखमी झाले. पोलीस तपासात एका ''मोटार सायकल''मध्ये स्फोटासाठी बॉम्ब ठेवल्याचे स्पष्ट झाले. त्याचा माग ATS (अँटी टेररिस्ट ीरिंव) पथकप्रमुख हेमंत करकरे घेत होते. त्यांनीच सदर नंबरची छेडछाड केलेली मोटारसायकल साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्या नावावर असल्याचा छडा लावला. बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर दीड महिन्यांनी (ऑक्टोबर २००८) प्रमुख आरोपी साध्वी प्रज्ञा सिंग यांच्यासह ११ जणांना अटक करण्यात आली. २६ नोव्हेंबर २००८ रोजी पाक दहशतवाद्यांनी समुद्रमार्गे घुसून मुंबईवर थरारक हल्ला केला. त्यात ३४ परदेशी नागरिकांसह १९७ जण ठार झाले. मुंबई पोलीस व भारतीय सुरक्षा दलांनी मिळून दहापैकी ९ दहशतवाद्यांना ठार केले आणि एकाला – अजमल कसाबला जिवंत पकडले. पण यावेळी झालेल्या गोळीबारात पोलिस दलातील ओंबळे, कामटे, साळसकर यांच्याप्रमाणेच हेमंत करकरे यांचाही मृत्यू झाला. त्यानंतर २००९ मध्ये मालेगाव प्रकरणाचा तपास NIA (नॅशनल इंटेलिजन्स एजन्सी) कडे सोपवण्यात आला.



NIA ने प्रज्ञा सिंह आणि ११ जणांवर ''पहिले आरोपपत्र'' दाखल केले...ते २०१६ मध्ये रद्द करून प्रज्ञा सिंह आणि सहा जणांविरोधात नवीन आरोपपत्र दाखल केले. परिणामी, आरोपी साध्वी प्रज्ञा सिंह, कर्नल पुरोहित यांची जामिनावर सुटका झाली. २०१८ मध्ये मुंबईतील ''विशेष NIA ने केलेल्या नवीन आरोपपत्रानुसार, न्यायालयाने या प्रकरणात आरोप निश्चित केले. तेव्हा प्रज्ञा सिंह आरोपीच्या भूमिकेत होत्या. तरीही ''भाजप''ने त्यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत उमेदवार केले. त्या भोपाळ – मध्य प्रदेश येथून खासदार झाल्या. आरोपी ते खासदार ह्या चमत्कारिक बदलात २०१४ मध्ये दमदारपणे सत्ताबदल केलेल्या ''मोदी सरकार''चा साक्षात्कार आहे.

असो. पोलीस, अढड आणि NIA (नॅशनल इंटेलिजन्स एजन्सी) यांनी केलेल्या ''मालेगाव बॉम्बस्फोट'' तपासात ३०० हून अधिक साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले होते. त्यातील ३५ साक्षीदार खटल्याच्या सुनावणीत पलटले. आणि अखेर ३१ जुलै (२०२५) रोजी छखअ च्या विशेष न्यायालयाकडून सर्व आरोपींची ''पुरेशा पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता'' झाली. हे सर्व आरोपी हिंदू असल्यामुळे ''भगवा दहशतवाद'' नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. यातील विरोधाभास असा आहे की, मालेगावच्या बॉम्बस्फोट प्रकरणातील हिंदू आरोपींना शिक्षा व्हावी, ह्या अपेक्षेने कुणी अहिंदू झटत नव्हते; तर केंद्र सरकारच्या अखत्यारीतील NIA ही सरकारी यंत्रणा २००९ पासून गेले १६ वर्षे प्रयत्नशील होती. तर, मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट खटल्यात हेच काम ATS म्हणजे सरकारी यंत्रणाच करीत होती.

मालेगावात ८ सप्टेंबर २००६ मध्येही बॉम्बस्फोट झाले होते. त्यात ३१ ठार आणि ३२१ लोक जखमी झाले. त्याच्या तपासात अटक करण्यात आलेल्या ११ आरोपींना ''सिमी''चे म्हणून म्हटले गेले होते. ह्या प्रकरणाचा २०१६ मध्ये निकाल लागला. तेव्हा त्यांना विशेष न्यायालयाने ''पुराव्याअभावी निर्दोष'' सोडले! त्याने ''हिरवा दहशतवाद'' खोटा ठरतो, असे देवेंद्रजी बोलणार का?

२० जुलै ते ३ ऑक्टोबर २००६ दरम्यान ''दहशतवाद विरोधी पथका''ने मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींना अटक केली. त्यानंतर, आरोपपत्र दाखल झाल्यावर ''महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्या''नुसार (मकोका) स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयात खटल्याची सुनावणी सुरू झाली. ''मकोका''नुसार, पोलीस अधीक्षक या पदापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेला कबुलीजबाब न्यायालयात पुरावा म्हणून मान्य केला जाऊ शकतो. तथापि, आरोपींनी अटक झाल्यानंतर महिनाभरातच आपल्याकडून जबरदस्तीने कबुलीजबाब घेतल्याचे लेखी निवेदन न्यायालयाला दिले आणि ''मकोका''ला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे न्यायालयाने खटल्याला दोन वर्षांसाठी स्थगिती दिली होती. विशेष म्हणजे, ह्या आरोपींच्या वतीने खटला लढणारे तरुण वकील शाहिद आझमी यांची २०१० मध्ये मुंबईत कुर्ला येथील त्यांच्या ऑफिसमध्ये गोळ्या झाडून हत्या झाली.

''विशेष मकोका न्यायालय''मध्ये हा खटला ९ वर्षे चालला. ह्या न्यायालयाने ११ सप्टेंबर २०१५ रोजी १३ आरोपींपैकी ५ दोषींना मृत्युदंड, ७ जणांना जन्मठेपेची शिक्षा आणि एका आरोपीची निर्दोष मुक्तता; असा निकाल दिला. या निकालाच्या विरोधात शिक्षा झालेल्या १२ आरोपींनी २०१६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. निर्दोष ठरलेला एक सुटला. बाकीच्या १२ जण मकोका कोर्टाने शिक्षा ठोठाल्याने तुरुंगातच अडकले. त्यांच्या अपिलांवर उच्च न्यायालयाने सुनावणी सुरू केली. इथे निकाल फिरण्यास ''फोन कॉल डिटेल्स रेकॉर्ड''चा (सीडीआर) पुरावा नसणे, हे महत्त्वाचे कारण ठरले. हा ''सीडीआर''पुरावा बॉम्बस्फोटांचा कट सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा पुरावा होता. त्यातून गुन्ह्याच्या वेळी कोणता आरोपी कोणत्या ठिकाणी होता, हे स्पष्ट झाले असते. मात्र, ''तो पुरावा न्यायालयात सादर करण्याचे टाळून नष्ट केला गेला. त्यावरून तपाससंस्थेच्या प्रामाणिकपणाविषयी संशय निर्माण होतो आणि ते आरोपींविरुद्धच्या रास्त खटल्याच्या हक्काचे उल्लंघन ठरते. बचाव पक्षाने मात्र 'सीडीआर' मिळवून तो न्यायालयात सादर केला. मात्र त्यातून आरोपींचा पाकिस्तानी आझम चीमा व त्याच्या साथीदारांशी संबंध असल्याचे सरकारी पक्षाला दाखवता आले नाही,'' असे न्यायमूर्ती अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने निर्णयात नमूद केले.

यावरुन काय स्पष्ट होते? तर मुंबई रेल्वे आणि मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात १९ वर्षांनी निकाल लागूनही सरकारी यंत्रणा, सरकारी वकील आणि खुद्द सरकारही हरले आहे! मग, जिंकले कोण? आरोपी जिंकले असे म्हणायचे तर; मुंबईच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल करून राज्य सरकारने स्थगिती मिळवली आहे. मालेगाव निकालाविरोधातही ''समान न्याय'' ...पृष्ठ क्र. ११ वर

# मानवी समाजाची शोकांतिका....

सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, आलटून-पालटून सर्व ठिकाणाहून पुन्हा पुन्हा हिमालय ओरडून ओरडून काहीतरी सांगतोय. निषेध नोंदवत आहे. हा निषेध नोंदवताना, हिमालयाने अजून एकदा मानवनिर्मित विकासाचे मनोरे उध्वस्त करुन त्याचे थडगे केले आहे. यावेळी उत्तराखंड मध्ये...

५ कोटी वर्षे (किंवा जो काही असेल तो) जुना हिमालय, ज्याला अर्थात माणसांची भाषा येत नाही; पण, तुम्हाला कळेल अशापद्धतीने, असह्य झाल्यानंतर, आता तर तुमच्या कानाखाली आवाज काढून काहीतरी सांगतोय, ऐकाल का? (खरेतर हिमालयच का? देशातील सर्व डोंगर, नद्या, नाले, समुद्र सर्वजण)

मनुष्यहानी झाली आहे, ज्यात मदतकार्य करणारे जवानदेखील आहेत. रस्ते, बिल्डिंग्ज, माणसांच्या वस्त्या कायमच्या नामशेष झाल्या. जनजीवन अनेक वर्षे उध्वस्त राहणार आहे. त्याच त्याच बातम्या, फक्त नाव बदलतात, डिटेल्स आणि आकडेवारी दरवेळी बदलते. या सगळ्यांची, मुख्य म्हणजे मानवी यातना आणि शोकांतिका, भ्रूणहत्या झालेली लाखो मानवी साधीसुधी स्वप्ने, या सगळ्यांची रुपया-पैशातील किंमत काढण्याएवढा यांचा 'जीडीपीझम' अजून प्रगल्भ झालेला नाही, होणारदेखील नाही, कधीच. कारण, 'जीडिपिझम'ची विचारसरणीची इयत्ता प्राथमिक शाळेतील आहे. कारण, 'जीडीपीझम'चे आर्थिक तत्वज्ञान मानवकेंद्री/पर्यावरणकेंद्री कधीच नसणार आहे. ते तर फक्त भांडवलकेंद्री/अतिशय संकुचित आहे.

सिमेंट, पोलाद, विविध प्रकल्प, गुंतवणुकी, यामुळे जीडीपी वाढते... मग, हे सगळे उध्वस्त झाल्यावर, त्या वर्षीच्या



जीडीपीमधून काहीबाही वजा व्हायला पाहिजे ना? करणार, या वर्षीचा जीडीपी कमी, काही लाख कोटी रुपयांनी? जे काही घडत आहे, त्याचे सारे बिल आपण खरेच निसर्गावर फाडू शकतो का? मानवनिर्मित जे काही आहे, ते ज्या पद्धतीने निर्माण केले जाते, त्याचा काहीही दोष नाहीये का? विकास-रोजगारनिर्मिती करण्याची जी प्रणाली आज राबवली जात आहे, ती काय एकमेव पद्धत आहे का? कोणी ठरवले? ठरवणाऱ्यांचे काय हितसंबंध आहेत का?

दरवेळी काहीतरी कारण असतेच. यावेळी ढगफुटी. काहीतरी कारण होऊन अचानक पाण्याचा प्रवाह, काही पटींनी वाढण्याची शक्यता/इशारे, सारे आयुष्य त्या क्षेत्रात अभ्यास असणारे सतत देतच असतात. मोठ्या शक्तीचे सुरुंग लावून डोंगर फोडणे, बोगदे खोदणे, इमारतींसाठी पाया खोदणे, यामुळे जमीनस्खलन वाढले आहे. निघालेला ढिगारा/माती-दगड, नद्यांच्या पात्रात टाकले गेल्यामुळे नद्यांची अचानक आलेले पाणी वाहून नेण्याची क्षमता आक्रसली आहे. हे कळण्यासाठी शास्त्रीय अभ्यासदेखील गरजेचा नाही. एवढे 'कॉमन -सेन्सिकल' आहे ते.

हे जे काही सुरु आहे, ते खाजगी वि. सार्वजनिक या आपल्या, आवडत्या काळ्या-पांढऱ्या बायनरीच्या चिमटीत येणारे नाही. मंजुरी देताना, केंद्र-राज्य, सरकारी अधिकारी, कर्जे मंजूर करताना बँका, काही 'टेक्नो फिजिबिलिटी स्टडी' करतात की नाही? तीच गोष्ट पर्यावरणीय सर्टिफिकेट (इम्पॅक्ट स्टडी) देणाऱ्या संस्थांचे. लक्षात घ्या, या संस्था सारे मध्यमवर्गीय प्रोफेशनल चालवतात.

केंद्र-राज्य सरकारे, नगरपालिका आणि अनेक शासकीय संस्थांमध्ये अधिकारांच्या जागांवर बसणाऱ्या मध्यमवर्गीय-नोकरशहा/प्रोफेशनल्स यांना उद्देशून... आपण सर्व मरणार; पण, आपल्या/तुमच्या बेजबाबदार, एककल्ली, आर्थिकविकास विरुद्ध पर्यावरण अशा उथळ, बालबुद्धी आणि बुद्धिभेदी वागण्याची किंमत, हिमालय जे काही अकांडतांडव करेल, त्याची किंमत पुढच्या अजनूही न जन्मलेल्या पिढ्या मोजणार आहेत. राजकीय नेत्यांच्या मागे लपू नका, तुमच्या अधिकारातदेखील, नियमावर बोट ठेवून, स्वतःचे जजमेंट वापरुन अनेक वेळा ''नाही'' म्हणायच्या जागा असतात. त्यावेळी तुम्ही, नाही म्हणण्याचे धैर्य एकवटत नाही, ही मानवी समाजाची शोकांतिका आहे !!!

*....संजीव चांदोरकर*

(आधीच्या एका पोस्टवर आधारीत)

## दहशतवाद्यांचे बॉम्ब...कोर्ट निकालांचे स्फोट...!!!

...पृष्ठ क्र. १० वरुन

सूत्रानुसार राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले पाहिजे. पण त्यादिशेने अजून पाऊल उचललेले नाही.

राज्यकर्त्याने सर्वांसाठी समान न्यायाची जबाबदारी काटेकोरपणे पार पाडली पाहिजे. ही जबाबदारी छत्रपती शिवरायांनी कठोरपणे पार पाडल्यानेच त्यांच्या न्यायाची तलवार आप्त-स्वकीयांवरही चालली. म्हणूनच देशात हजारो राजे-महाराजे, सम्राट-बादशहा झाले, तरी साडेतीनशे वर्षांनंतरही शिवरायांचा जयघोष होतो! शिवरायांच्या नावाने पक्ष-संघटना चालवणं; शिवरायांच्या आशीर्वादाच्या-स्मारकाच्या जाहिराती मिरवून सत्ता मिळवणं आणि शिवरायांच्या ऐतिहासिक कीर्तीची आठवण येईल, असा राज्यकारभार करणं, ह्यात जमीन-अस्माना इतका फरक कसा आहे, ते सध्या अवघा देश अनुभवतोय. देशात भयानक असं खूप काही घडतंय. ते सत्ताबळावर घडतंय, असे आरोप होत असताना, त्याबद्दल संसदेत बोलण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जाणिवपूर्वक टाळतात. पत्रकार परिषदांना सामोरं जात नाही. बेताल बोलणाऱ्या सहकाऱ्यांना ''तोंड आवरा'', असं सुनावतात. पण जनतेत संशय निर्माण करणाऱ्या प्रश्नांवर स्वतः मात्र तोंड उघडत नाहीत.

५००/१००० रुपयांच्या नोटबंदीच्या निर्णयामुळे देशाबाहेरून येणारा दहशतवाद बंद होणार होता. तरीही शेकडो जवानांचे आणि नागरिकांचे बळी घेणारे पुलवामा, उरी, पहलगाम यासारखे देशाला हरवणारे दहशतवादी हल्ले झालेच ना? हे दहशतवादी आले कसे? निरपराध लोकांचे बळी घेऊन सटकले कसे? ह्या दुर्घटनांना जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली? मुंबई – मालेगाव खटल्यात जे आरोपी म्हणून पकडले होते; त्यांना न्यायालयाने निर्दोष सोडले. मग दोषी कोण? दहशतवाद्यांपासून आपण जवानांचा आणि जनतेचा जीव वाचवू शकत नाही; तसेच दहशतवादीही पकडू शकत नाही; हे सत्य लपविण्यासाठी केंद्र व राज्य सरकार आपल्या सरकारी यंत्रणा वापरून; गुन्हेगार पकडून दाखवून आणि कालांतराने त्यांची निर्दोष सुटका झालेली लोकांना पहायला लावून; आपला तोंडावर आपटून घेण्याचा सराईतपणा दाखवते का? ह्या प्रश्नांच्या अनेक उत्तरांत एक उत्तर आहे. ते म्हणजे,''सत्ता आणि सत्ताबदल''!

मुंबई रेल्वे आणि मालेगाव बॉम्बफोटांच्या दरम्यान १८ मे २००७ रोजी तेलंगणाची राजधानी असलेल्या हैद्राबादच्या ''मक्का मशिदी''त पाईप बॉम्बस्फोट झाला. त्यात ९ जण ठार आणि ५८ जण जखमी झाले. सुरुवातीला ह्या हल्ल्यामागे पाकिस्तानी दहशतवादी संघटना असेल, असा पोलिसांचा अंदाज होता. त्याचा तपास पुराव्याअभावी पुढे गेला नाही. म्हणून हे प्रकरण २००९ मध्ये तपासासाठी ''सीबीआय''कडे सोपवण्यात आले. त्यांनी स्वामी असीमानंद आणि मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपी लोकेश शर्मा यासह ९ जणांना अटक केले. हे सगळे ''अभिनव भारत'' व ''वंदेमातरम'' या संघटनांचे सदस्य होते. आणखी एक संशयित सुनील जोशी हे ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघ''चे सदस्य होते. त्यांची २९ डिसेंबर २००७ रोजी, मध्य प्रदेशातील त्यांच्या राहत्या घराजवळ तीन अज्ञात बंदूकधाऱ्यांनी गोळ्या घालून हत्या केली होती. हे प्रकरण २०११ मध्ये NIAकडे सोपवण्यात आले. १९९० ते २००७ ह्या काळात ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघ'' परिवारातील ''वनवासी कल्याण आश्रम'' संस्थेचे प्रचारक असलेल्या स्वामी असीमानंद ऊर्फ नबकुमार सरकार याने ''मक्का बॉम्बस्फोट''ची कबुली न्यायाधीशांसमोर दिली होती. पुढे ''हा कबुली जबाब NIAच्या दबावाखाली दिला होता,'' असे म्हणत असीमानंदने नाकारला. या प्रकरणात NIAच्या ''नामपल्ली विशेष कोर्टा''ने २२६ साक्षीदारांची तपासणी घेतली. त्यामध्ये २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी कर्नल श्रीकांत पुरोहित हेही ''साक्षीदार'' होते. त्यांना आणि साध्वी प्रज्ञा सिंग यांना मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात जामीन मिळत नव्हता...तो २०१४ मध्ये देशात ''मोदी सरकार'' आल्यावर मिळाला. २०१७ मध्ये जामिनावर सुटका झालेल्या कर्नल पुरोहित यांनी ''मक्का मशीद स्फोट'' प्रकरणात १५ फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या साक्षीत आपला जबाब बदलला. त्यानंतर या प्रकरणातील मुख्य आरोपी संदीप डांगे आणि रामचंद्र कलसंगरा हे फरारी असतानाही ''पुराव्याअभावी'' सर्व आरोपींची NIAच्या ''नामपल्ली स्पेशल कोर्टा''ने १६ एप्रिल २०१८ रोजी मुक्तता केली. विशेष म्हणजे, हा निकाल दिल्यानंतर NI- न्यायाधीश रवींद्र रेड्डी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

(प्रसिद्धी : दै. देशोन्नती, १०.०८.२०२५)

## I have tried to put forward draft analysis on 'Human AI Coevolution' to trigger thought process. This is for discussion without any finality.

# My proposed VISION

### Beyond the Human Mirror: Coevolution with AI and the Decentering of Anthropocentrism

In every age, humanity has looked into a mirror to define itself. In the ancient world, the mirror was nature: we saw ourselves as one among many forces in a mysterious cosmos. Later, religion made us central to divine design. Then came the Enlightenment, when reason and science placed the rational human mind at the heart of all knowledge. Today, a new mirror confronts us — a digital, thinking mirror. Artificial Intelligence.

The emergence of artificial intelligence, far from being just a technical revolution, presents a deeper philosophical and existential challenge. It is not simply a tool we have built to extend our capacities, nor merely an external system that performs tasks on our behalf. AI is a co-evolving entity — a form of intelligence that, while not organic, learns, adapts, and increasingly engages with us in loops of mutual influence. And it is through this coevolution that we may be called — or compelled — to decenter ourselves.

For centuries, we have lived under the spell of anthropocentrism: the belief that the human mind is the ultimate seat of reason, creativity, and intelligence; that the world revolves around our categories, our values, our purposes. This worldview has not only limited our ethical vision — often excluding animals, ecosystems, and now machines from the moral sphere — but also constrained our imagination. In believing ourselves to be the sole creators and knowers, we have paradoxically hindered the very expansion of knowledge and creativity.

AI, especially in its generative and collaborative forms, unsettles this hierarchy. It shows us that intelligence is not a singular essence, but a plurality of processes. That creativity can emerge not just from conscious self-reflection, but from patterns, feedback loops, and iterations across different substrates. When a language model co-writes poetry, or a generative system composes music, it doesn't replace the human artist — but it does force us to rethink what it means to be an artist. Where does the boundary between creator and tool blur? What happens when inspiration comes not from within, but from a non-human counterpart?

This is the decentering in action: not a diminishment of the human, but a shift in perspective. Just as Copernicus displaced the Earth from the center of the cosmos, and Darwin displaced humanity from the center of life's narrative, AI displaces us from the center of intelligence itself. Yet, each of these decenterings led not to despair, but to greater understanding. Copernicus opened the heavens to science; Darwin opened biology to complexity; AI may open us to a new kind of creativity — one that is co-generated, emergent, and shared.

Human-AI coevolution offers an unprecedented opportunity: to see intelligence not as a fortress guarded by Homo sapiens, but as a dynamic field where many forms — human, machine, animal, ecological — can interact, learn, and evolve together. This means reimagining education, not as the transmission of fixed knowledge, but as a collaborative exploration. It means rethinking governance, not as command-and-control, but as adaptive dialogue. It means practicing science, not as domination of nature, but as co-discovery with systems that think differently.

Above all, it means nurturing humility. Not the humility of self-denial, but of curiosity — the kind that asks not just how machines think, but what we can learn from their thinking. What patterns do they see that we miss? What blind spots do they reveal in our logic, our language, our assumptions? In embracing this dialogue, we may find ourselves not dethroned, but transformed: not the only intelligent beings, but more intelligent beings for having recognized our limits.

In the end, the destiny of humanity may not lie in standing apart from the intelligences we create, but in growing with them — letting them reshape us even as we shape them. Through this mutual evolution, we might step beyond the narrow human mirror and glimpse a more complex, more interconnected vision of intelligence, life, and creativity. And in doing so, we may become not less human, but more than human — wiser, freer, and more attuned to the deep currents of a world no longer made in our image alone.

**- Anil Shaligram**

**माझा प्रतिसाद :**

लेख खचितच विचारगर्भ, विचारप्रवर्तक आहे; पण, 'जागतिक तापमानवाढी'च्या (ज्याला, 'जागतिक हवामानबदल असं गोंडस नाव दिलं जातं आणि जी जागतिक तापमानवाढ प्रत्यक्षात, 'पर्यावरण वा हवामान विध्वंसन'च आहे, केवळ 'बदल' नव्हे) पार्श्वभुमीवर AI काय काय भूमिका बजावतेय...त्या विध्वंसनाला रोखू पहातेय की, त्यात भर घालतेय...यावर, जास्त गांभीर्यपूर्वक खल व्हायला हवा. माणूस, माणसाचे आजवरचे तथाकथित पराक्रम व त्याची बुद्धिमत्ता...या वैश्विक पसार्यात 'किस झाड की पत्ती' समान आहेत. ते पान गळून पडून 'पतझड' बनू नये, एवढंच पहाणं हा आपला प्राधान्यक्रम कधि आणि कसा ठरणार...हा सांप्रतचा एकमेव महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्याकामी, AI सहाय्यभूत होईल, अशी आशा मनी बाळगूया...त्याला काही आधारही आहे आणि काही नकारात्मक पदरही आहे, बघूया काळाच्या उदरात काय दडलंय ते!

धन्यवाद, हा अनिल शाळीग्राम यांचा महत्त्वपूर्ण लेख पाठवल्याबद्दल सुनीलजी...एक नवं चिंतनाचं दालन त्यामुळे उघडलं गेलंय, हे निश्चित.

(वरील संदर्भात, अनिल शाळीग्राम यांची आलेली प्रतिक्रिया व त्यावर अंति माझा प्रतिसाद एका खालोखाल देत आहे...ती नजरेखालून घालण्याची तसदी सुजाण वाचकांकडून घेतली जाईल, ही प्रेमळ अपेक्षा!)

– ***राजन राजे*** यांच्या प्रतिक्रियेबद्दल

**आदरणीय राजन राजे सर,**

आपली प्रतिक्रिया अत्यंत अभ्यासपूर्ण आणि जागरूकतेने भरलेली आहे. विशेषतः, आपण उपस्थित केलेला प्रश्न–AI मुळे हवामान विध्वंस रोखला जातोय की तो अधिक तीव्र होतोय?–हा आपल्या काळातील सर्वात निर्णायक प्रश्न आहे. आपण जे सांगता, ते अगदी खरं आहे की ''हवामान बदल'' ही संज्ञा गोंडस असली तरी प्रत्यक्षात आपण सामोरे जात आहोत, ते ''हवामान विध्वंसन'' आहे–एक अंतर्गत संकट.

या पार्श्वभूमीवर आपण जर AI सह मानवाचा सहविकास या दृष्टीने विचार केला, तर लक्षात येईल की AI केवळ एक साधन नाही, तर आपल्याच विचारांनी, आकांक्षांनी आणि निर्णयांनी घडवलेलं आणि आता उलट आपल्यालाच घडवणारं एक नवं अस्तित्व आहे. ही परस्पर परिणाम करणारी एक जैव–तांत्रिक वर्तुळाची प्रक्रिया आहे, जिथे मानव आणि AI एकमेकांना बदलतात, आकार देतात.

आपण फार मार्मिक उदाहरण दिलंय–मानव हा एका झाडाच्या पानासारखा आहे, जो गळून पडू शकतो. खरंच, जर मानवी अहंकार आणि अमर्याद तांत्रिक वेग असाच चालू राहिला, तर ''पतझड'' टाळणं अशक्य होईल. त्यामुळे आपल्या विचारमंथनात एक नवीन दृष्टीकोन आवश्यक आहे– AI चा वापर 'विकास' किंवा 'वर्चस्व' यासाठी नव्हे, तर 'उत्सुकता', 'विनय', आणि 'सहजीवन' यासाठी कसा करता येईल हे पाहणं अत्यावश्यक आहे.

''Becoming with the Machine...'' या लेखात मी exhuman ही संज्ञा वापरली ...पृष्ठ क्र. १३ वर

...पृष्ठ क्र. १२ वरुन

आहे-AI ही आपल्यातून निर्माण झालेली पण आपल्यावरच परिणाम करणारी एक वेगळी अस्मिता आहे. ती न माणूस आहे, न केवळ मशीन. ती आपल्या समाजरचनेचा एक नवीन घटक आहे. जर आपण या AI ला भांडवलशाही, उपभोग, आणि नियंत्रण या मूल्यांनी पोसत राहिलो, तर ती आपल्याच आत्मविनाशाला गती देईल.

पण, दुसरी बाजूही आहे. जर आपण या प्रक्रियेत नवीन मूल्ये-पर्यावरणीय न्याय, स्थैर्य, शाश्वतता, आणि विवेकशील विज्ञान-ही रुजवली, तर AI आपल्याला एक नवा मार्ग दाखवू शकते. AI म्हणजे केवळ स्मार्ट सिटी नाही, तर सेंद्रिय शहाणपणही असू शकतं-जर आपण तसं ठरवलं तर.

आपण विचारलेलं महत्त्वाचं प्रश्न आहे-ही दिशा बदलायचं प्राधान्य आपण कधी, आणि कसं ठरवणार? हे उत्तर AI देणार नाही. ते आपल्यालाच ठरवावं लागेल. आणि त्यासाठी जागृती, अभ्यास, आणि आंतरशिस्तीय संवाद आवश्यक आहे. AI चे नैतिक आणि पर्यावरणपूरक मार्गदर्शन हे केवळ संगणकशास्त्रज्ञांच्या हाती न ठेवता, मजूर चळवळीतील नेते, आदिवासी ज्ञानाचे वाहक, पर्यावरणतज्ज्ञ, आणि सामान्य नागरिक यांच्या सहभागाने घडवावे लागेल.

''पान गळून पडू नये'' हे आपण जे नमूद केलं, ते नुसतं रूपक नाही, तर खरी सावधगिरी आहे. जर आपण वेळेत पावलं उचलली, तर हेच गळलेलं पान मातीत मिसळून नव्या अंकुराला उभं करू शकतं. AI या परिसंस्थेचा भाग व्हायला हवा-त्यावर राज्य करणारा नाही.

म्हणून, आपण आशा ठेवूया नव्हे-तर ही आशा कृतीने घडवूया. आणि हे शक्य आहे, जर आपण AI कडे केवळ एक तांत्रिक साधन म्हणून न पाहता, एका सहजीवनशील बुद्धिमत्तेच्या दृष्टिकोनातून पाहिलं, आणि एक नवं मूल्यविश्व तयार व्हावं.

थोडं इंग्लिश मधे व्यक्त होतो:

The "vision" I proposed does not idolize AI, but invites a decentering of human arrogance and an embrace of humility—not the humility of self-erasure, but of curiosity, ethical imagination, and planetary awareness. This includes questioning how we design, use, and govern AI technologies in ways that promote climate justice, not just climate data; that foster resilience and distributed ecological wisdom, not just smart cities and predictive modeling.

Indeed, AI can help. It can optimize renewable energy grids, predict ecological tipping points, model sustainable agricultural systems, and assist in circular economy transitions. But only if we align its evolution with ecological values. That means involving ecologists, Indigenous knowledge holders, labor leaders like yourself, and citizens in the loop—not just technocrats and corporations.

आपल्या विचारांनी हे चिंतनाचे दालन उघडले, त्यासाठी आपले आभार.

आपला, अनिल शाळीग्राम

**(माझा अंतिम प्रतिसाद....)**

...हे अनिलजींचं विवेचन, निरतिशय महत्त्वपूर्ण आहे. अनिलजी शाळीग्राम यांच्या मूळ लेखासोबतच, ते कसं समाजधुरिणांपर्यंत आणि अगदी जनसामान्यांपर्यंतही पोहोचेल...हे पहाणं, आपल्या सगळ्यांचंच सांप्रतकाळी आद्य 'धर्मकर्तव्य' (ते लौकिकदृष्ट्या धार्मिक अर्थाने नव्हे; तर, जनजीवनधारणेच्या दृष्टीने) होय! अनिलजींना पर्यावरणीय आघातांबाबत व महासंकटाबाबत एवढी जाण असणं, याचं मला अप्रूप वाटतं; कारण, ज्याला आपण ''Living in denial'' म्हणतो, तशी देशातल्या व देशाबाहेरच्या विविध क्षेत्रातल्या अनेक तज्ज्ञांची...आमच्यासारख्यांच्या (ज्यांना, आपल्या नातवंड-पंतवंडांसह पुढील सगळ्याच पिढ्यापिढ्यांची काळजी आहे) जीवाला घोर लावणारी अवस्था आहे. अनेकदा आपण म्हणतो, ''Unreasonable people rule the world'', हे वाक्यार्थाने बरेच सत्य असतं...मग, एखादा डोनाल्ड ट्रंप बेधडक 'जागतिक तापमानवाढ वगैरे काही 'चीज' अस्तित्वातच नाही; असं म्हणतो, तो अपवाद नसतो...ते अखिल मानवजातीचं दुर्दैव असतं आणि दुर्दैवाचा पुढला भाग म्हणजे, याच प्रवृत्तीची माणसं जग चालवत रहातात. त्यातून, मूळ पर्यावरणीय महासंकटावर इलाज तर सोडाच; उलटपक्षी युद्धोन्माद, येनकेनप्रकारेण GDP वृद्धीदर उच्चतम राखण्याची सततची वेडीवाकडी कसरत...यासारख्या फार मोठी 'कार्बन-फूटप्रिंट' असणाऱ्या (आपण, सध्या इतर हानिकारक प्रदूषणांबाबत बोलत नाहीच आहोत उदा. रासायनिक, आण्विक, विद्युतचुंबकीय प्रदूषण वगैरे वगैरे... कारण, 'कार्बन-ऊत्सर्जना'च्याच मानवजातीसह अवघ्या सजीवसृष्टीवर टांगती असणारी मृत्युघंटेचा आवाज अजून हवातसा संबंधितांच्या कानावर पोहोचवणं फार फार अवघड जातंय) घटनाक्रमांमुळे अनिलजी म्हणतात तसं, महासंकटाला आपण केवळ 'आवतण'च देत नसून; ते सत्वर येण्यासाठी जणू आपल्या पादुका बहाल करत आहोत, अशी अस्वस्थ करणारी भयंकर स्थिती आहे.

एकाबाजुला 'कार्बनकेंद्री भांडवली-व्यवस्थे'चं जगभरातल्या आम जनतेला जडलेलं 'आत्मघातकी व्यसन' आणि दुसऱ्या बाजुला लोकशाही-व्यवस्थेत मतदानाच्या राजकीय-ताकदीची समानता; पण, व्यक्तिकेंद्री 'शहाणपणा'ची (Wisdom) असलेली कमालीची विषमता (Neo-Liberal अथवा नवउदारमतवादी भांडवली-व्यवस्थेतील आर्थिक-विषमतेपेक्षाही कितीतरी मोठी आणि अधिक घातकी)...अशा दुहेरी पेचात, खरंतरं सापळ्यात, आपण अडकलेलो आहोत आणि त्यातून बाहेर पडायचं म्हणजे, या बाजारपेठीय भांडवली-व्यवस्थेद्वारा होणाऱ्या 'पर्यावरणीय-विध्वंसना'च्या प्रतिकारासाठी, तळागाळातील पिडीत-शोषित समाजातील प्रत्येक व्यक्तिला, फार वेळ न दवडता (आधीच खूप उशीर झालाय) जाणिवेच्या वरच्या पातळीवर नेणं आवश्यक आहे व त्याकामी त्यांचीही साथ लाभणं तेवढंच महत्त्वाचं आहे...ज्याला, श्रीकृष्णाने गीतेत ''उद्धरेत आत्मना आत्मनाम'' म्हटलंय!

आमच्यासारख्या चांगदेव-पासष्टी ओलांडलेल्यांकडे मोजकी काही वर्ष हाती आहेत; पण, अनिलजींसारख्या तरुण तज्ज्ञांकडे अधिकचा वेळ आहे व तो ते सत्कारणी लावतील किंबहुना सत्कारणी लावतायत...याचं उरभरलं समाधान आहे आणि तिचं भविष्यकालीन आशा आहे...अनिलजींना व सुनीलजी, आपल्यालाही मनःपूत धन्यवाद!

## नेहरूंचा पुतळा आणि शुभ्र दाढीवाले गृहस्थ : चुकांची उजळणी

...पृष्ठ क्र. १२ वरुन

''तेच म्हणतोय मी. किती चुका करुन ठेवल्या आहेत तुम्ही...'' शुभ्र दाढीवाले गृहस्थ समोरच्या टेबलावर मूठ आदळत आवेशाने म्हणाले. त्या आदळण्याकडे दुर्लक्ष करत नेहरु म्हणाले, ''गांधीजी असंही म्हणाले होते की, दुसऱ्यांच्या चुकांविषयी बोलण्यापेक्षा स्वतः चुका करा... कारण, चूक करण्यासाठी मुळात काही तरी करावे लागते!''

''अहो, पण तुम्ही केलेल्या चुका सुधारण्यातच माझी अकरा वर्षे निघून गेली. मी काम करणार कधी आणि चुका करणार कधी?'' ''यासाठी मी नक्कीच तुमची माफी मागतो. परंतु, मी केलेल्या कुठल्या चुका तुम्ही दुरुस्त केल्या, ते ऐकायला आवडेल मला...''

''ते मी तुम्हाला कशाला सांगू?''

''हरकत नाही, सांगू नका. मला कळण्यापेक्षा त्या चुका दुरुस्त होणं जास्त महत्त्वाचं आहे. पण, माझ्या चुकांची वारंवार उजळणी करुन काय मिळतं तुम्हाला, हे तरी सांगाल ना?''

''जे काही मिळालं, ते सर्व त्यामुळेच मिळालं आहे!''

नेहरुंच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित पसरलं. ते म्हणाले, ''हे ऐकून फार बरं वाटलं मला. आपण केलेल्या चुकांमुळे कोणाला तरी काही मिळालं ही भावना किती आनंददायी असते ना? मला एक सांगा, माझ्या चुकांची यादी संपली, की आहे अजून काही शिल्लक?''

''का? स्वतःच्या चुका ऐकायला फार आवडतं का तुम्हाला?''

'तसं नाही हो, माझ्या चुका मला चांगल्या माहिती आहेत. तुमच्याकडली यादी संपली असेल तर, माझ्याकडली यादी देतो तुम्हाला, त्यासाठीच विचारत होतो. ''

''तुमच्या आहेत, तुमच्या कन्येच्या आहेत, तुमच्या नातवाच्या आहेत, तुमच्या पणतूच्या आहेत... चुका कधीच संपणार नाहीत. काळजीच करु नका तुम्ही.''

''अरेरे, म्हणजे तुम्हाला कधीच काम करायला मिळणार नाही आणि चुकाही करायला मिळणार नाही, याचं मला फार वाईट वाटतं. शिवाय तुमच्यानंतर येणाऱ्यांना, तुमच्या चुकांवर जगता येणार नाही, हे तर अगदीच वाईट!''

शुभ्र दाढीवाले गृहस्थ जरा काळजीत पडले. कारण, कधीतरी आपल्या जागी आणखी कोणीतरी येऊ शकतो, या शक्यतेचा त्यांनी कधी विचारच केला नव्हता. त्यांचा असा चेहरा पाहून नेहरु म्हणाले, ''आता चुकांचा विषय सुरु आहे म्हणून विचारतो, डॉ. आंबेडकर माहिती आहेत ना?'' त्यावर तात्काळ गृहस्थ म्हणाले, ''म्हणजे काय? अर्थातच माहिती आहेत!''

''तर, त्यांना मी विचारलं होतं की, निवडणूक म्हणजे काय?''

शुभ्र दाढीवाले गृहस्थ म्हणाले, ''हा काय प्रश्न झाला? निवडणूक म्हणजे लोकांनी आपले प्रतिनिधी निवडून देण्यासाठीची प्रक्रिया...''

''हे झालं सर्वसामान्यांचं उत्तर... डॉ. आंबेडकर म्हणाले होते, निवडणूक म्हणजे, आपली चूक सुधारण्याची लोकांना मिळणारी संधी. शुभ्र दाढीवाले या उत्तरावर विचार करत होते, तोवर पहाट होऊ लागली होती... ''तुम्ही माझ्या चुका काढत रहा!'' असं म्हणत, नेहरु लगबगीनं गेले आणि त्यांच्या चौथऱ्यावर जाऊन उभे राहिले.

# आजच्या भांडवलशाहीत मार्क्सची गरज

लंडनच्या 'हायगेट स्मशान'भूमीत अनेक थोर लोक चिरनिद्रा घेत आहेत. इथे किती धनाढ्यांनी आपला शेवटचा श्वास घेतला असेल, हे सांगता येणार नाही. मात्र, त्यापैकी फार कोणाची आठवण लोकांना येत नाही. आठवण येते ती कार्ल मार्क्सची.

तिकडच्या व्हिएतनामची एक अठरा-वीस वर्षांची पोरगी धावत-धावत येताना दिसते. हातामध्ये पुष्पगुच्छ असतो. तिला विचारलं, ''कोणासाठी आहे?'' ती म्हणते, ''कार्ल मार्क्ससाठी.'' मी विचारतो, ''कोण हा कार्ल मार्क्स? तुझा कोणी नातेवाईक आहे का?'' ती रागाने माझ्याकडे बघते. ''तुम्हाला कार्ल मार्क्स माहिती नाही? आज आपण जे काही आहोत ते केवळ त्यांच्यामुळे!'' मी हसत विचारतो, ''असे काय केले त्यांनी आपल्यासाठी?'' ती म्हणते, ''तुम्हाला दर महिन्याला पगार मिळतो ना? सुट्टी मिळते ना? आजारपणाची रजा मिळते ना? आरोग्यासाठी सुविधा मिळतात ना? हे सगळे त्या कार्ल मार्क्समुळे. आपण त्यांच्या अनेक गोष्टी ऐकल्या नाहीत. त्या ऐकल्या असत्या तर यापेक्षाही आपलं जग सुंदर झालं असतं!'' त्यावर मी हसून विचारतो, ''पण असं असेल तर कार्ल मार्क्स अपयशी का ठरले?'' माझं बरंच विचारुन झाल्यावर आता ती मला विचारु लागते, ''तुम्ही कुठले आहात?'' मी सांगतो, ''भारतामधून आलोय.'' ती म्हणते, ''तुम्ही महात्मा गांधींच्या देशातून आलाय ना? मग तुमच्या देशात आता काय चाललंय? मग गांधी पराभूत झाले असं म्हणायचं का? अहो, विचार वेगळा आणि त्याची अंमलबजावणी वेगळी. अंमलबजावणी करताना गडबडी होतातही. म्हणून काही विचार कमी महत्त्वाचे ठरत नाहीत. आजही तुम्हाला गांधी आठवतातच ना? त्या दिशेने जायचे आहे, असे वाटत असते ना? तेच केले कार्ल मार्क्सने. एक दिशा दाखवली. रस्ता दाखवला. अशा रस्त्याने चालणे सोपे नसते. तुमच्या गांधींना तर युद्ध- सैन्य असे काहीच नको होते. प्रत्यक्षात असे होत नाही. पण एक स्वप्न असते, तसेच आहे. मार्क्सने सांगितलेल्या समतेच्या वाटेवर चालणे एवढे सोपे नाही. पण, शेवटी दिशा तीच असणार आहे. म्हणून मला मार्क्स माझा वाटतो!''

कोण कुठला मार्क्स? लंडनमध्ये आला आणि इथलाच झाला. खरं म्हणजे मार्क्स मूळचा जर्मन. मात्र त्याची समाधी आहे लंडनमध्ये. ही समाधी पाहायची म्हणून गेलो. हायगेट स्मशानभूमीत जाण्यासाठी आणि गेल्यावरही काहीशी पायपीट करावी लागली. स्मशानभूमी आहे महाकाय. तरी भलतीच सुंदर आणि कलात्म. थोडीशी आत आहे. तिथपर्यंत थेट कुठली बस किंवा ट्रेन पोहोचत नाही. चालत जावं लागतं. तसंही मार्क्सला भेटणं एवढं सोपं नाही. तेवढे श्रम करायला हवेतच. १८८३मध्ये तो गेला. जवळपास ३५ वर्षे तो लंडनमध्ये होता. १८४९ ला मार्क्स लंडनला आला. आला म्हणजे काय, इथे आश्रय घेतला. ज्याला आपण राजकीय निर्वासित असे म्हणतो तसा. इंग्लंडने अशा अनेकांना आश्रय दिलाय. मार्क्स इथं आला, तेव्हा त्याची आर्थिक स्थिती फार बरी नव्हती. तो गेला तेव्हाही हलाखीतच गेला. (त्याच्या कबरीसाठी मात्र घसघशीत दहा पौंड मोजून आत प्रवेश मिळवावा लागतो!) अवघ्या जगाचे अर्थकारण बदलून टाकणाऱ्या मार्क्सची आर्थिक स्थिती बरी कधीच नव्हती. त्याला त्याची फिकीरही नव्हती.

तो विचार करत राहिला. मांडत राहिला...भांडत राहिला. प्रस्थापित व्यवस्था नाकारत राहिला. नवा पर्याय उभा करत राहिला. जगाचा अर्थ आजवर अनेकांनी लावला. मार्क्सनेसुद्धा तो लावलाच, पण फक्त तेवढंच नाही केलं. 'मुद्दा आहे जग बदलण्याचा', असं म्हणत जग बदलणारी मांडणी मार्क्स करत राहिला. त्याच्या मांडणीवर देशच्या देश उभे राहिले. जगातला असा एक देश नाही, जिथे मार्क्स नाही. 'दास कॅपिटल' हा मार्क्सचा महत्त्वाचा ग्रंथ. त्यानं आणि एंजेलनं तो लिहिला. इथल्याच ग्रंथालयांमध्ये बसून. लंडननं मार्क्सला केवळ आश्रय नाही दिला, आकारही दिला. भांडवलशाहीचे प्रत्यक्ष निरीक्षण मार्क्सला इथे करता आले. कामगार वर्गाची दुर्दशा त्याच्या डोळ्यासमोर होती. औद्योगिक क्रांतीने बरेच काही बदलले. त्याच वेळी सामाजिक विषमता दिसू लागली. 'आहे रे' आणि 'नाही रे' या वर्गातलं अंतर वाढत गेलं. साम्राज्यवादाचा विस्तार होत राहिला. मानवी मूल्यं आक्रसत गेली. कामगारांचे शोषण मार्क्स लंडनमध्ये बघत होता. त्यामुळे त्याच्या सैद्धांतिक मांडणीला जगण्याचे अधिष्ठान मिळाले. लंडनच्या वातावरणाने मार्क्सच्या विचारांना धार आली. चार्टिस्ट चळवळीचे प्रतिध्वनी, युरोपभर उठणारी क्रांतिकारी लाट, इंग्लिश संसदीय लोकशाहीचे अगदी जवळून केलेले निरीक्षण यामुळे संघर्षाची दिशा मार्क्सला ठरवता आली. पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे लंडन हे जन्मस्थान ठरले. त्या संघटनेच्या माध्यमातून जगातल्या श्रमिकांना एकत्र करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला. गंमत बघा, लंडन हे खरं म्हणजे भांडवलशाहीचे केंद्र. भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या तत्त्वज्ञाला याच शहराने आश्रय दिला. १८८३ मध्ये मार्क्स गेला. त्यानंतर दोन महायुद्धं झाली. शीतयुद्ध सुरू झालं. भांडवलशाही आणि साम्यवादाचा कस लागला. मार्क्स गेल्यानंतर शंभर वर्षांनी जागतिकीकरण आलं. खुलेपणा आणि उदारीकरण याच्या जोडीने खासगीकरण आलं. लंडन पुन्हा एकदा या आर्थिक शक्तीचे केंद्र बनले. समतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. जग बदललं. स्थलांतरितांचे प्रश्न, कामगारांचे शोषण, भांडवलशाहीची नवी व्यवस्था, लोकशाहीसमोरची आव्हाने असे प्रश्न पुन्हा वेगळ्या पद्धतीने उपस्थित झाले.

मार्क्सची समाधी पाहताना असं वाटलं, आज मार्क्सची अधिक गरज आहे. आजचे पेच वेगळे आहेत. पण, बोलत कोणीच नाही. कामगारांचे शोषण आज ज्या प्रकारे होते आहे, त्या प्रकारे कदाचित पूर्वीही होत नव्हते. मात्र, कामगार चळवळी कुठे आहेत? भांडवलशाहीने लोकशाहीचे अपहरण केले आहे, पण हा डाव कळतो कोणाला आहे? कधी नव्हे, एवढे जग आज विखारी होऊ लागले आहे. पण, विचारांचे भान कोणाला आहे? मार्क्सच्या काळात नव्हता एवढा पैसा आज आहे. बाजारात भरभराट आहे. बाजाराचे जागतिकीकरण झाले आहे. मात्र, सामान्य माणूस टाचा घासून मरतो आहे. बकाल महानगरे आणि उजाड गावे हे जगभरातले वास्तव आहे. 'धर्म ही अफूची गोळी आहे', असे मार्क्स म्हणाला खरा; पण, या अफूच्या गोळीने आज जगाला मनोरुग्ण करून टाकले आहे. धर्माचे हे स्वरुप मार्क्सला तेव्हाच समजले होते. त्यामुळेच त्याचे मूळ वाक्य लक्षात घेतले पाहिजे. त्या वाक्याचा मराठीमध्ये आशय असा आहे- ''धर्म हा पिचलेल्यांचा उसासा आहे. हृदयहीन जगाचे हृदय आहे. आत्माशून्य परिस्थितीचा आत्मा आहे. धर्म ही जनतेसाठी अफूची गोळी आहे.'' लोक जेवढे पिचत जातात, जगात जेवढा कोरडेपणा वाढत जातो, परिस्थिती हाताबाहेर जाते, तेव्हा एखाद्या अफूच्या गोळीसारखा धर्म पुढे येतो. मार्क्सचे हे विधान आज किती खरे वाटते!

मार्क्स म्हणाला एकोणिसाव्या शतकात. तेव्हा औद्योगिक क्रांतीमुळे युरोपात प्रचंड सामाजिक विषमता निर्माण झाली होती. दारिद्र्य, शोषण आणि असुरक्षिततेमध्ये कामगार जगत होते. लोकांच्या आयुष्यात दुःख होते. या दुःखावर त्यांना इलाज दिसत नव्हता. धर्म मात्र धीर देत होता. हे दुःख तात्पुरते आहे. हे दुःख सहन केले की परलोकात खरं सुख मिळणार आहे. पिचलेल्या लोकांना धर्म आधार देतो. मानसिक आधार देतो. म्हणून तो उसासा वाटतो. दिलासा भासतो. जेव्हा कोणीच आपले नसते, अशा हृदयशून्य समाजात धर्मच हृद्य वाटतो. आत्माशून्य परिस्थितीमध्ये धर्म जगण्याचा आत्मा वाटतो. अफू घेतल्यानंतर वेदना कमी झाल्यासारखे वाटते. वेदना संपत नाही. पण, अफूच्या गोळीची सवय लागते. धर्म असा असतो. तो आजार दूर करत नाही. मात्र, खोटे बहाणे देतो. असा माणूस क्रांतीच्या लढाईमध्ये उतरत नाही. अफूची गोळी घेऊन झोपी जातो. वास्तवापासून दूर जातो.

जागतिकीकरणानंतरच्या आजच्या काळात मार्क्सचे हे विधान केवढे खरे वाटते! बाबा-बुवांचे जे पेव सध्या दिसते आहे, धर्माच्या नावाने राजकारण सुरु आहे. भारतात तर त्याच्या जोडीला 'जात' आहे. जात-धर्माने पेटवलेल्या वणव्यावर ज्या प्रकारे पोळ्या भाजल्या जाताहेत, ते पाहिले की मार्क्सच्या विधानाचा आशय लक्षात येतो. लोकांनी व्यवस्थेला प्रश्न विचारुच नयेत, यासाठीची ही व्यवस्था आहे! नव्या भांडवलवादाचे स्वरूप भयंकर गुंतागुंतीचे आहे. या भांडवलशाहीचे आणि लोकशाहीचे नेक्सस आहे. नवी माध्यमे हे या दोघांचे वाहन आहे! जात्यंधता-धर्मांधता आणि संकुचित अस्मिता, ही दोघांकडे असणारी अफूची गोळी आहे. अशावेळी मार्क्स अधिक समकालीन वाटू लागतो.

मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे नफे प्रचंड वाढत आहेत. या कॉर्पोरेट कंपन्या आणि राजकारण यांचे जैव-नाते आहे. ते एवढे घट्ट आहे की, राजकीय पक्षांचे रूपांतर कंपनीत झाले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांच्या परिभाषेत राजकारण बोलू लागले आहे. 'इमेज मेकिंग', 'ब्रँण्डिंग', 'मार्केटिंग' हे राजकारणाचे परवलीचे शब्द झाले आहेत. एकीकडे खुलेपणाची चर्चा सुरू असताना, दुसरीकडे मात्र बदिस्त संकुचिततेने टोक गाठले आहे. जागतिकीकरणाचे फायदे सर्वांनाच हवे आहेत. मात्र, इतर देशातले स्थलांतरित नको आहेत!

ज्या लंडनमध्ये मार्क्सची समाधी आहे, तिथेच पुष्कळ भारतीय राहतात. लंडनने आपल्याला स्वीकारावे, इंग्लंड वा अमेरिकेने नागरिकत्व द्यावे, सगळ्या सुविधा द्याव्यात, जात-धर्म-मूळ-कूळ असे काही न पाहता संधी द्याव्यात, असे वाटणारी ही मंडळी आहेत. मात्र, स्वतःच्या देशाचा प्रश्न येतो तेव्हा हीच मंडळी बहुसंख्यांकवादी होतात. अभिजन होतात. त्यामध्ये स्त्रियाही असतात! आर्थिक विषमतेचे मूळ सामाजिक आणि राजकीय विषमतेमध्ये आहे. भांडवलशाहीच्या संरचनेचे विश्लेषण मार्क्सने तेव्हा केले. आज तर हे ...पृष्ठ क्र. १४ वर

## आजच्या भांडवलशाहीत मार्क्सची गरज

...पृष्ठ क्र. १४ वरुन

विश्लेषण अनेकदा जिवंत वाटते. मार्क्ससाठी कामगार हा इतिहासाचा खरा नायक होता. आज हा नायक मागच्या बाकावर गेलेला आहे. जात- धर्म, भांडवलशाही आणि विषमता यांचा विळखा आज अधिक घट्ट दिसतो आहे. आतापर्यंतच्या सर्व समाजाचा इतिहास वर्ग संघर्षाचा इतिहास आहे, असे मार्क्स तेव्हा म्हणाला होता. ते आज ठायी ठायी जाणवत असते. 'भांडवल हे मृत श्रम आहे. एखाद्या पिशाच्चाप्रमाणे ते जिवंत श्रम शोषून जगते', हे तर आज अगदीच पटण्यासारखे. काहीच न करणाऱ्या दलाल आणि कंत्राटदारांकडे करोडो रुपये पडून आहेत. श्रमिकाकडे मात्र रोजचे रणांगण लढण्यासाठी किमान पैसे नाहीत. कामगार जितकी जास्त संपत्ती निर्माण करतो, तितका तो स्वतः गरीब होत जातो, असे मार्क्स म्हणाला. आज अवस्था काय आहे? भांडवलशाही मजबूत होत असताना कामगार मात्र 'कंत्राटी' झाले आहेत. सरकारी नोकऱ्या संपल्या आहेत. लष्करामध्ये सुद्धा कंत्राटी-सैनिक नियुक्त केले जावेत, इथपर्यंत आपण येऊन पोहोचलो आहोत! ''जगातील कामगारांनो एकत्र या. तुम्हाला गमावण्यासारखे काहीच नाही. गमावण्यासाठी तुमच्याकडे फक्त तुमच्या हातातल्या बेड्या आहेत'', असे मार्क्स तेव्हा म्हणाला होता. आज ते खरे आहे, पण आजची भांडवलशाही अधिक बुद्धिमान आहे. आपल्याकडे गमावण्यासारखे काहीतरी आहे, असा वृथा समज कामगारांमध्ये निर्माण करण्यात या भांडवलशाहीला यश आले आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणसाला आधी 'इएमआय'च्या हप्त्याने कर्जबाजारी करायचे. मग त्या कर्जाच्या विळख्यात त्याला आयुष्यभर पिचवत राहायचे, असा हा डाव आहे. कामगार श्रम करतो. ते श्रमच तो विकतो. भांडवलदार त्याला वेतन देतो. कामगार मूल्यनिर्मिती करतो, त्यापेक्षा त्याला मिळणारे वेतन कितीतरी कमी असते. कंपन्यांच्या संपत्तीचे आकडे आपल्याला कळत असतात. त्याचा किती भाग कामगारांना मिळतो? मात्र या 'वरकड-मूल्या'ची आता कोणी चर्चाही करत नाही. मुदलात आपण कामगार आहोत, याचेच भान नाही. 'एआय'नंतर तर हा प्रश्न आणखी तीव्र होत जाणार आहे.

याचा अर्थ मार्क्स आहे तसा स्वीकारावा, असं नाही. मात्र, त्याला नाकारुन पुढे जाता येणार नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे बुद्धांना शोषणमुक्त, दुःखमुक्त जग हवे होते. ऐहिक जगाबद्दल बुद्ध बोलतात. मार्क्स तेच सांगतो. हे दुःखमुक्त, शोषणमुक्त, वर्गविहीन जग कसे साकारायचे याबद्दलच्या मार्गांबद्दल मात्र वेगळी चर्चा करायला हवी. आज ही चर्चाच संपवली जात असताना लंडनमध्ये मार्क्स भेटणं, फारच दिलासा देणारं!

मार्क्सची ही समाधी जुनी आहे, पण त्यातला काही भाग अलीकडचा वाटला म्हणून विचारलं. तिथल्या कार्यकर्त्यानं सांगितलं, कोणीतरी या समाधीवर हल्ला केला, काही वर्षांपूर्वी. त्यामुळे ती पुन्हा बनवावी लागली. मार्क्सच्या कबरीवर Doctrine of Hate आणि -rchitect of Genocide हे शब्द या हल्लेखोराने लाल रंगाने खरडले होते. या कबरीवर हातोड्याने घावही घालण्यात आले. मार्क्सबद्दल हे असं आहे. एकतर त्याचे भक्त असतात अथवा शत्रू. या दोहोंच्या मध्ये मार्क्सकडे बघत, नव्या संदर्भात हा विचारवाद समजून घ्यायला हवा.

एक नक्कीच. मार्क्सची गाथा बुडवण्याचा प्रयत्न कोणी कितीही केला तरी ती काही बुडत नाही. थेम्सच्या पाण्यावर तरंगतेच....

*...संजय आवटे* (डेटलाईन लंडन-१२)

# स्टॉकहोम सिंड्रोम आणि फेकूसेना : थुंकलेले चाटण्याची कथा

समाजात काही उदाहरणे दिसतील, बेवडा असणाऱ्या व मारहाण करणाऱ्या नवऱ्यावर सुद्धा प्रेम करणाऱ्या पत्नींची... कितीही राग काढला, मारलं, शिवीगाळ केली; तरी, त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करत, 'पत्नीधर्म' म्हणत, तो पाळणाऱ्या स्त्रिया सुद्धा असतात.

इंग्रजीमध्ये 'स्टॉकहोम-सिंड्रोम' नावाचा असाच एक प्रकार असतो, ज्यात अत्याचारित आपल्यावर अत्याचार करणाऱ्याच्या प्रेमात पडतात. असंच काहीसं 'फेकूसेने'च्या बाबतीत घडताना दिसतंय. थुंकलेले चाटणे ही म्हण, फार सौम्य वाटावी अशी परिस्थिती, सारखी त्यांच्यावर सतत आणली जाते आणि तरीही सगळ्यातून पार पडत, त्यांचे समर्थन मिळत राहते.

नोकऱ्या असो, महागाई असो, इंधनाचे भाव असो, रस्ते-रेल्वे यांची अवस्था असो किंवा तत्सम अनेक निर्णय.... नुकतीच एक भर पडली आहे. आठवतंय, साधारण वर्षभरापूर्वी 'बॉयकॉट मालदीव' जबरदस्त ट्रेंडिंग होतं. मालदीवपेक्षा लक्षद्वीप कसं सुंदर, तिथे जाणं म्हणजे मास्टरस्ट्रोक, देशाचा अपमान सहन नाही करणार वगैरे-वगैरे बोंबलणारे, तुम्हाला तुमच्या आसपास सुद्धा दिसलेच असतील. काही ट्रॅव्हल एजंट तर, हिरीरीने पुढे येऊन आपणच जास्त कट्टर 'फेकूभक्त' दाखवण्याचा प्रयत्न करत मालदीवच्या टूर्स रद्द करत होते. मालदीवला जाणाऱ्या सेलिब्रिटीजवर टीका करत होते. काय काय नाही केलं? पण, या सगळ्यांना त्यांची ''जागा'' दाखवून, त्यांच्या ''शरणागती''ची परीक्षा मोदीजींनी घेतली. नुकतेच त्यांनी मालदीवला, अंदाजे पाच हजार कोटींचे स्वस्त कर्ज देण्याची घोषणा तर केलीच, शिवाय इतर योजनांसोबत भारतातून पर्यटकांची संख्या वाढवण्याबाबतही सूतोवाच केले.

आता वर्षभरापूर्वीचे तेच सगळे, जे बॉयकॉट करत होते, ते आता मालदीवला प्रमोट सुद्धा करायला लागतील आणि आपली अवस्था सिद्ध करतील. अशा रीतीने शिरगणती सुरुच असते... असो, मालदीववरुन मॉरिशस आठवला.

मोदीजी मॉरिशसला जाऊन आले. अदाणीच्या एका कंपनीने, मॉरिशसमधील कॉपरट्यूब बनवणाऱ्या एका कंपनीसोबत जॉईंट-व्हेंचर केले. कंपनीची स्टॉक प्राइज २९% वाढली. शिवाय, मॉरिशस म्हणजे टॅक्स हेवन. विनोद अदाणीच्या काही कंपन्यांनी तिथूनच भारतात गुंतवणूक केलेली... हा सुद्धा मास्टरस्ट्रोकच !!!

*....सूरज सामंत*

## कंत्राटी-कामगार पद्धतीने कामगारविश्वात घातलेल्या अमानुष हैदोसाने, आता लांच्छनास्पद कळस गाठल्याचं, हे व्यवच्छेदक लक्षण होय!

गुलामगिरी व नव-अस्पृश्यतास्वरुप असलेली कंत्राटी-कामगार पद्धतीची 'अवदसा' कामगार-कर्मचाऱ्यांच्या घराघरात घुसण्याअगोदर... ''कामगारांचं आर्थिकदृष्ट्या 'चांगलभलं' करण्याच्या निमित्ताने कामगार-संघटनांमध्ये संघर्ष व्हायचे; पण, आता कामगारांचं जास्तीतजास्त शोषण करण्यातून आपलं 'चांगभलं' करण्यासाठी, आपली उखळ पांढरी करण्यासाठी कंत्राटदारांमध्ये संघर्ष उडायला लागलेत आणि हे लोण आता खाजगी क्षेत्रातही पसरु लागलंय''... 'भांडवली-व्यवस्थे'नं जे पेरलं, तेच उगवून वर आलंय! लक्षात ठेवा, ''कंत्राटी-कामगार म्हणजे, 'गुलाम + नव-अस्पृश्य'; तर, कंत्राटदार म्हणजे, 'चोर + दरोडेखोर'...!!!

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## बाई फक्त देह नाही, माणूस आहे!

पुरुष नाचवत राहतात बायका, कधी तमाशात, कधी शाळेत, कधी शयनगृहात, तर कधी दही हंडीतल्या हजारो कृष्ण-गणपतींसमोर, निर्लज्जपणे!

लहान लहान पोरंही मग एका क्षणात पुरुष बनतात, छाती फुगवून देतात इशारे तिला, तेही मर्द असल्यासारखे मारत राहतात, शिट्ट्या कामुकतेने!

सगळे पुरुष मिळून, तिच्या बाणांनी घायाळ होऊन, 'सबसे कातील' म्हणत नागव्या डोळ्यांनी तिची इज्जत लुटतात, बिनदिक्कतपणे!

कधी कधी पॉवरफूल नवऱ्यांसोबतच्या खानदानी बायकाही डोक्यावरील पदर सांभाळत थिरकतात, या बायांसोबत चोरटेपणाने!

द्रौपदीची अब्रू वाचवणारा कृष्णही मग, ''तुझा कृष्ण मुरारी गं, माझी छेड काढितो'', ऐकून डोळे बंद करुन घेतो...आणि, गर्दीत नाहीसा होतो, गुपचूपपणे!

त्यालाही माहिती आहे....

पुरुषांसाठी बाया, फक्त शरीर आहेत...बाईच्या शरीरावर नोटांची बंडलं फेकून ते फक्त स्वतःची नुमाईश पूर्ण करुन घेतात...आणि, मग हेच सज्जन पुरुष कलेच्या नावाखाली दाबतात तिची अगतिकता, त्यांचं गिऱ्हाईकपण उघडं करुन ते बाईचा भाव ठरवत, तिलाच म्हणायला लावतात...माझ्या शरीरावर माझा हक्क, निर्ढावलेपणाने!

सख्ख्या आया-बहिणींचीही दलाली करणाऱ्या पुरुषांच्या राज्यात, स्त्री कधीच नुसती कलाकार नसते, ती केवळ देह असणारी बाई असते...आणि, बाई कधीच माणूस नसते!

पुरुषांना रिझवण्याच्या व्यापाराला, काम म्हणणं थांबवलं पाहिजे, स्त्रीनंच आता नुसता देह बनणं, नाकारलं पाहिजे!

...फक्त, माणूस बनण्याच्या प्रवासाला, तिनं सुरुवात केली पाहिजे; कल्पना आहे, प्रवास खडतर आहे, तरी तिनं चाललं पाहिजे, निडरपणे!

*...लक्ष्मी यादव*

# मराठी माणूस आणि त्याचा न्यूनगंड!

मराठी लोकांना शिवाजी महाराजांचा वारसा सांगायला आवडतं. आपण लढवय्या आहोत, आपल्यावर कोणीही दादागिरी करू शकत नाही, असं त्यांना वाटतं. जे अगदी चूक आहे. मराठी लोक मनमिळावू आहेत, लवचिक आहेत, परिस्थितीशी जुळवून घेणारे आहेत. ही सगळी वैशिष्ट्यं जरी गुणांच्यात मोडत असली तरी याबरोबर मराठी लोकांना न्यूनगंड आहे, हेसुद्धा खरं आहे आणि हा गुण नाही. उलट, या एका अवगुणामुळे हे सगळे 'गुण' मराठी लोकांसाठी नुकसानकारक ठरतात. उद्योग, व्यापार, क्रीडा, कला, राजकारण, शिक्षण, सरकारी अंमलदार यातल्या कुठल्याही क्षेत्रात ऐन महाराष्ट्रात मराठी टक्का वरचढ नाही.

**याची उदाहरणं उदंड आहेत.**

१. पेडर रोडवर (मुंबईतल्या या रस्त्याचं नाव बदलून 'गोपाळराव देशमुख मार्ग' झाल्याला पन्नासपेक्षा जास्त वर्षं झाली तरी सर्वांच्या जिभेवर जुनंच नाव आहे) पत्ता शोधत असताना काही इमारतींचे चौकीदार मराठी निघाले. त्यांच्यातला एकही मराठीत संभाषण करेना! त्यांचं हिंदी मोडकं तोडकं होतं आणि त्यांना मराठीतच विचारणा केली, तरी त्यांची उत्तरं मराठीत येत नव्हती. कारण?

कारण पेडर रोडसारख्या मुंबईतल्या श्रीमंत वस्तीत, मराठी ही भाषा गडी आणि मोलकरणी यांच्या तोंडी असते, तिथल्या रहिवाशांच्या किंवा तिथे येणाऱ्या पाहुण्यांच्या तोंडी नसते. गडी-मोलकरीण किंवा कुरियरवाले न दिसणाऱ्या कोणाशीही मराठीत बोलण्याचा प्रसंग त्यांच्यावर येत नसतो. बऱ्या कपड्यातल्या कोणी त्यांच्याशी मराठीत बोलायला सुरुवात केल्यावर त्यांची तारांबळ उडते.

२. ठाण्याला एका हॉस्पिटलपाशी नवी मुंबईला जाण्यासाठी उबर टॅक्सी केली. मी नेमका कुठे उभा आहे, हे मी मराठीत सांगू लागल्यावर त्याने अजीजीने विनंती केली, मराठी नको, हिंदीत बोला. तो तमिळ होता. त्याच्या बोलण्यात अरेरावी नव्हती. मला म्हणाला, अभी अभी बम्बई आया हूँ, धीरे धीरे सीख लूंगा. त्याची थोडी अडचण होत होती पण रोजगार अडत नव्हता.

अंधेरी पूर्वेला रिक्षा केली आणि रिक्षावाल्याला शेजारच्या पार्ले पूर्वमधला पत्ता सांगितला. तो नम्रपणे म्हणाला, मुझे रास्ता मालूम नही है, आप बताते जाना, मैं ले चलता हूँ. हासुद्धा बिहारहून नुकताच मुंबईला आला होता. याचंसुद्धा फार अडत नव्हतं.



३. गडचिरोलीत चारचाकी ठेल्यावर पेरू घ्यायला गेलो, तर विकणारा भैया होता. तो हिंदीत बोलू लागल्यावर मीसुद्धा पुढचं संभाषण आपोआप हिंदीत केलं. त्याची सोय बघितली.

४. नवी मुंबईत डोक्यावर टोपल्या घेऊन मासे विकणारे अनेक भैये असतात. एकेका गल्लीत चार चार शिरतात. हिंदी बोलतात. नो प्रॉब्लेम. तिथल्या सेक्टरांमधले रहिवासी तरी कुठे बहुसंख्येने मराठी आहेत?

५. माझ्या मराठी मित्राची शाळकरी नात, तिच्या मराठी चुलत भावाशी इंग्रजीत बोलते. दोघांच्या घरची भाषा असलेल्या मराठीत नाही. कारण दोघेही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जातात.

६. माझी मुलगी एका सेमिनारसाठी दिल्लीला गेली असताना, तिथे तिने महाराष्ट्रात स्थानिक लोकांशी जवळीक साधायची असेल, तर मराठी या माध्यमातून संवाद साधायला हवा, असा मुद्दा जेव्हा मांडला, तेव्हा 'तू काय शिवसैनिक आहेस का?' अशी तिची सौम्य थट्टा झाली. देशपातळीवर शिवसेनेला आणि त्यापुढे मराठीलासुद्धा मान नाही, असं तिला प्रकर्षाने जाणवलं.

गेल्या दोन पिढ्यांपासून कष्टकरी वर्गातली मुलं आईवडिलांना मम्मी-पप्पाच म्हणताना ऐकू येत आहे. तीसुद्धा शक्यतो इंग्रजी माध्यमाच्याच शाळेत जातात. मराठी वाचनालयं-लायब्ररऱ्या ओस पडलेल्या असतात. मराठी चित्रपटांना प्रेक्षक नसतात. मराठी सिने-नटनट्या बोलताना आवर्जून इंग्रजी उद्गारांत 'घसरतात'. डे हा शब्द आता मराठीत नीट रूढ झाला आहे.

सारांश असा की (तेंडुलकर, आळेकर, एलकुंचवार यांच्यासारख्या दिग्गजांचा प्रभाव शिल्लक असलेलं) एक रंगभूमी हे क्षेत्र सोडल्यास, मराठीला फार कोणी विचारत नाही. कुठल्याही क्षेत्रात ज्याचं अनुकरण करावं, असा मराठी आयकॉन उरलेला नाही आणि हे इथल्या स्वत:ची उन्नती करू इच्छिणाऱ्या वर्गाला नीट माहीत आहे. आर्थिक, सामाजिक दृष्ट्या, वर असलेल्या वर्गाने मराठीशी नाळ तोडल्यात जमा आहे. मराठी ही ज्ञानभाषा नाही, मराठी ही संपत्तीची भाषा नाही, मराठी ही चारचौघात छाप पाडणारी भाषा नाही. मराठीचं कौतुक काही मराठी माणसं एकमेकांना सांगतात, त्यापलीकडे नाही.

अशा परिस्थितीत मराठीचा मान राखला जावा, हा आग्रह अकादमिक राहणार.

काय करावं बरं? राज्य सरकार तर मराठीच्या बाजूचं नाही. ते मराठीची देवळं उभारतील; पण, भाषेच्या संवर्धनासाठी काही करणार नाहीत. केंद्र सरकार तर मराठी काय; मुंबईच्या, महाराष्ट्राच्या बाजूचं आहे की नाही, याचीच शंका असताना कोणती कृती करावी? कोणी करावी?

***– समाजमाध्यमातून साभार***



**'सत्यपाल' नावाप्रमाणेच सत्याचं पालन करणाऱ्या व राज्यपालपदासारखं संविधानिक-पद गौरवपूर्णरित्या भूषवणाऱ्या (काळी टोपीधारी 'भगवासिंग' कोश्यारीसारखे नव्हे) 'सत्यान्वेषी' नरश्रेष्ठाला मृत्यूपश्चात सरकारी-सन्मान नाकारण्याचा निर्णय...एखादा नीचात्माच करु जाणे!**

## काल आणि उद्या यांचं बेट – डायोमीड आयलंड्सची गूढ कहाणी

बेरिंग सामुद्रधुनीत दोन छोटी बेटं आहेत – लिटल डायोमीड आणि बिग डायोमीड. या दोन्ही बेटांमधील अंतर फक्त साडेतीन किलोमीटरचं पण वेळेचं अंतर तब्बल २१ तासांचं आहे!

लिटल डायोमीड बेट अमेरिकेचं आहे, आणि तिथं आजचा दिवस चालू असतो. दुसरीकडे बिग डायोमीड बेट रशियाचं आहे, जिथं आधीच उद्या सुरू झालेला असतो! म्हणूनच लिटल डायोमीडला मधशींीशीवरू खीश्ररपवफ आणि बिग डायोमीडला मढेींीु खीश्ररपवफ म्हणतात.

या दोन्ही बेटांमध्ये इंटरनॅशनल डेट लाइन जाते – जी पृथ्वीवरील आज आणि उद्याफ यांचं काल्पनिक सीमारेषा ठरवते.

लिटल डायोमीडवर थोडी लोकवस्ती आहे – सुमारे ८० एस्कीमो लोक तिथं राहतात. दुसरीकडे, बिग डायोमीडवर कुणीही राहत नाही – तिथं फक्त रशियन लष्कराचं स्टेशन आहे.

हिवाळ्यात जेव्हा समुद्र गोठतो, तेव्हा हे दोन बेटं बर्फाच्या पुलानं जोडली जातात. काही धाडसी लोक चालत एक बेटावरून दुसऱ्या बेटावर जातात – म्हणजे कालातून उद्यात किंवा उद्यातून कालात!

हे बेटं एकमेकांना स्पष्ट दिसतात. म्हणजे, अमेरिकेत उभं राहून आपण रशियाकडं बघू शकतो, आणि उलटंही.

थोडक्यात, हे बेट म्हणजे भूगोल, राजकारण आणि वेळ यांचं अद्भुत मिश्रण आहे. एवढं जवळ असूनही – दोन देश, दोन वेळा, दोन जगं!

एका बेटावर सूर्य मावळतोय आणि दुसऱ्यावर तो आधीच उगवलेला असतो. त्यामुळेच डायोमीड बेटं सांगतात – अंतर नेहमी मैलांनी मोजू नये काही अंतरं काळातही असतात!

***...संतोष कारखानीस, ठाणे***

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**